साल अरव अंगास ........ ०४
करकोळ —री बद्दल.
नोरि —ोच आंत रु. १
१० ओळी० ओळीस ०१०६
पुढें दर —लिपेस ........ ०१
दुसरे

Per [annum] in arrears 7
Six monthly ............ 3
Single copy
Adverti
Below 10 lin
Per line over
Repetition per

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXI — वर्ष २२
AKOLA MONDAY 7 MAY 1888 — NO
अकोला सोमवार तारीख ७ माहे मे सन १८८८ इ० — अंक

FOR SALE.

A Dog-cart and horse with harness complete. Apply to G. Montgomery. Assistant to the Civil Surgeon Amraoti—Berar.

विक्री करितां

—.—.— घोडे व घोडागाडी ( लहान गाडी ) घोड्यास करणें झाल्याच्या सामानासुद्धां. ती विकत घेणें इच्छिणाऱ्यास खालील गृहस्थांकडे जे. मॉटगोमरी असिस्टंट उमरावती सिव्हिल सर्जनच वऱ्हाड.

### नोटीस.

र.० रा० गोमाजी वल्लद रामाजी परमाळे वस्ती कजबे पातूर तालुके बाळापूर यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तारीख ४—४—८८ इसवी रोजीं दिलेल्या नोटीशीचें उत्तर देण्यांत येतें कीं मी दस्तऐवज तुम्हा पासून करून घेण्याचे वेळेस कोर्टांत रजिष्टरचे समक्ष रुपये २०० शे तुम्ही मजपासून घेऊन दस्तऐवज पुरा करून देऊन नंतर दुसरे दिवशीं दस्तऐवजांतील स्थावर व जंगम मालाचा कबजा तुम्ही माझे समागमें येऊन करून दिले असें असून तुम्ही मजला पोकळ नोटीशीनें कळविलें त्याज वरून झालेला व्यवहार रद्द होईल असें होत नाहीं. आमचा दस्तऐवज तुम्हास रजिष्टर कचेरींतून मिळाला आहे त्याज बद्दल मीच नोटीस देण्याचे तयारींत होतो इतक्यांत तुह्मीच नोटीस दिली आहे ती पोकळ आहे. नोटीस पावतांच दस्तऐवज आणून द्यावा दस्तऐवज आणून न दिल्यास रीती प्रमाणें तजवीज करीन कळावें तारीख ३ माहे मे सन १८८८ इसवी.

( सही. )
देवजी वल्लद निरमाजी पाटील निशानी खुद.

वऱ्हाडसमाचार.

मिती चैत्र वद्य १२ शके १८१०.

## हिंदुस्थानांतील रेलवे.

हिंदुस्थानांत एकंदरीनें रेलवेचा व्यापार सरासरी १२६०३ मैल भर चालतो. कंपन्यांनीं सुरूं केलेल्या रेलवे पांच आहेत व सरकारी रेलवे कंपन्या चालवितात अशा अकरा आहेत. याशिवाय सरकारच्या मदतीनें तयार झालेल्या रेलवे चार आहेत व निखालस आमच्या राजे रजवाड्यांनीं चालूं केलेल्या रेलवे सात असून त्यांचा फैलाव साऱ्या ७८७ मैलावर आहे. या सर्व रेलवेंत 'इस्ट इंडिया' कंपनीचा विस्तार मोठा आहे व उत्पन्नाचें प्रमाण ही फार भारी ह्मणजे ...... आठवड्यास ९८ ...... दरमैली प्रत्येक ...... रुपये पडतात. मुंबई बडोदा रेलवेचा प्रसार लहानसा ४८७ मैलांवर असून हा उत्पन्न प्रत्येक आठवड्यास दरएक मैलीं जवळजवळ ५०६ रुपये पडतें. यावरून गुजराथेंत व्यापार मोठा चालतो हें उघड आहे. जी. आय. पी. रेलवे कंपनीचा यंदा सालगुदस्त प्रमाणें चळचळाट नाहीं व त्या व्यापाराच्या कमी प्रमाणाच्या मानानें उत्पन्नांत ही गेल्या वर्षीपेक्षां ४,७०,८०० रुपयांची तूट पडली आहे यावरून जी.आय.पी. रेलवे नादान झाली असें नाहीं. तिच्या सारखी दुसरी गबर कंपनी तीच आहे. वायव्य प्रांताकडे यंदा व्यापार फार मंदावला असल्यामुळें तिकडील रेलवेच्या उत्पन्नांत मागील सालापेक्षां १६३८१२२ रुपयांची वुड लागली आहे. त्याच्या खालोखाल राजपुताना माळवा रेलवेचें चालूं हिशोबी सालीं १३,७२,-१४३ रुपयांचें नुकसान झालें आहे. गेल्या वर्षी इतकें उत्पन्न होण्यास इस्ट इंडिया रेलवेस ७७१०५८ रुपयांची भर पदरची घातली पाहिजे; आणि सर्वांत मुख्यत्वेंकरून लोक्या पण टुमदार मुंबई बडोदा रेलवे कंपनीच्या गुदस्त सालच्या उत्पन्न झालेल्या रकमेस ११,९२,३७२ रुपयांची कमतरता पडली आहे. ह्यावरून साधारणपणें हिंदुस्थानांत नांवारूपास आलेल्या रेलवे कंपनीस चालूं वर्षीं व्यापारानें कांहीं जास्त हात न देतां लक्षावधि रुपयांची तूट पाडली आहे हें उघड होतें. वर निर्दिष्ट न झालेल्या रेलवे कंपनीस सरासरीनें त्यांच्या त्यांच्या मानानें यंदा थोडाबहुत फायदाच झाला आहे.

रेलवेचा प्रसार जसजसा फैलावत जातो तसतसें देशांतील निरनिराळ्या भागांचें दळणवळण वाढतें. ठिकठिकाणीं रेलवेच्या संबंधानें व्यापारास तेजी येते. त्यामुळें देशाची उन्नती होण्याचा एक राजमार्ग रेलवे खुला करिते इत्यादि साधारण सिद्धांत हिंदुस्थानच्या रेलवे संबंधानें लागूं पडत नाहींत हे वस्तुस्थितीवरून स्पष्ट दिसून येईल. हल्लीं रेलवे कंपन्या अनेक आहेत, कांहीं कांहीं उदयास येत आहेत आणि कालक्रमानें पुष्कळ होतील तरी आही एकदम त्यावरून हिंदुस्थानचें कल्याणच होईल असें सांगू शकत नाहीं. हिंदुस्थानचें रेलवेपासून हिताहित ठरविण्यापूर्वीं त्या त्या रेलवे सुरूं करणार कोणी विलायतच्या कंपन्या आहेत, किंवा आमच्या विलायत सरकारनीं प्रत्यक्षपणें स्वतांच्या तिजोरीकडे नजर देऊन नवीन रेलवे चालूं केल्या आहेत, अथवा आमच्या राजे रजवाड्यांनीं रेलवे चालविल्या आहेत अगर आमच्या शेटसावकार गर्भश्रीमान सुखवस्तु लोकें इत्यादि गृहस्थांनीं कंपन्या स्थापून रेलवे देशांतून नवीन काढिली आहे अशा व या सारख्या दुसऱ्या अनेक गोष्टी मनांत आणिल्या पाहिजेत ह्मणजे नंतर ...... पासून होणाऱ्या नफातोट्याचा निर्णय करितां येईल. ...... देशाचा उत्तरोत्तर अभ्युदय होण्यास देशांतील संपत्ति ...... गत झाली पाहिजे म्हणजे व्ययाच्या मानानें आदा अधिक पाहिजे. विलायतेतून लोक हिंदुस्थानांत येऊन रेलवे काढतात व दिवसानुदिवस त्यांच्या किफायतीस काडिमात्र धक्का नाहीं ह्या गोष्टी आमच्या डोळ्यापुढें साक्षांत उभ्या आहेत तेव्हां ह्या कंपन्या हिंदुस्थानांतून खर्चीपेक्षां जास्त पैसा विलायतेस लांबवितात इतकेंच नव्हे तर हिंदुस्थानच्या संपत्तीची खोऱ्याकावड्यांनीं एकसारखी लुट मांडिली आहे. बहुतेक सर्व बड्या कंपन्या थेट विलायतच्या आहेत तेव्हां देशांत आणखी सहस्त्रशः नवीन रेलवे निघाल्या तरी आपल्या देशाचें त्यापासून बरें न होतां उलटें त्या रेलवेचा उत्कर्ष हा आपल्या देशास अपकर्षाचा पाया लागला असें आम्ही समजतों. आमच्या लोकांनीं दुसऱ्या देशांतली गोष्ट राहिली पण निदान आपल्या हिंदुस्थानांत रेलवे काढिल्या व त्यांचा थोडाथोडा फायदा हात गेला तरी ती गोष्ट आह्मांस अभिनंदनीय वाटेल.

---

भोपाळच्या बेगम साहेब व सर लिपेल ग्रिफीन या उभयतांमध्यें वैमनस्य पडण्याचें एक गुप्त कारण असें सांगतात कीं सर लिपेल साहेबाचे बेगम साहेबांच्या कन्येशीं देशाच्या रिवाजा प्रमाणें असभ्य वर्तन मातोश्रीस न आवडल्यामुळें परस्परांचीं मनें कलुषित झालीं आहेत. कन्या सुस्वरूप आणि तरुण आहे व तिच्या भेटीस विशेष सयुक्तिक कारण नसतांही सर लिपेल वारंवार जात असत. सर लिपेल यांचें मन निष्कपटी असून ते आपल्या सांबभोळे स्वभावास अनुसरून राजकन्यवरील आपलें शुद्ध व निर्मळ प्रेम प्रदर्शित करण्यास जात असतील- पण हा साहेबाचा सात्विक संकल्प लोकांस खरा वाटण्या सारखी साहेबांची लायकी अद्याप लोकमतें ठरली आहे असें खात्रीनें ह्मणतां येणार नाहीं. साहेब बाहादुरांस मराठमोळा किंवा पैगंबरी गोषा सारख्या चालीरीती ठाऊक नाहींत म्हणून त्यांच्या हातून हा प्रकार घडला असेल असें ह्मटले ह्मणजे ते आपल्या कामीं नालायक ठरतील. साहेबांचे वसतीनें आजपर्यंत अनेक वर्षें हिंदुस्थान देशांत आहे, व त्या वेळांत त्यांनीं मोठमोठ्या हुद्द्यांचीं पुष्कळ कामें केलीं आहेत. भोपाळास साहेब वागले असें पूर्वीं वागले असते तर त्यास मागेंच विलायतेस जिवानिशी प्रयाण करणें भाग पडलें असतें. विलायती लोक तरुण कुमारिकांस अथवा सभ्य कुलस्त्रियांस स्वच्छंदानें भेटण्यांत कांहीं पाप मानीत नाहींत ...... मानूं नये. पण अशा शिष्टाचाराच्या भेटींत कुशलक्षेमाचे प्रश्न किती परिमित असावेत आदरातिथ्य पाहुण्याचें कितपत व्हावें ...... बद्दल निर्बंध नसणें हिंदुस्थानच्या लोकांस आवडत नाहीं ह्याबद्दल आमचे धर्मशास्त्र साक्ष देत आहे. शुक मुनीचें अनुकरण करणारे गृहस्थ आमच्या इकडे फार थोडे असून ...... विलायतेस सर्वच तसे असावेत असें युरोपियन स्त्रियांच्या पातिव्रत्याच्या सहस्त्रावधि उदाहरणांवरून दिसून येईल. आशिया खंडांतील संप्रदाय व चाली फार भिन्न आहेत साहेबांच्या भेटी प्रतिभेटी बेगम साहेबांस कांहीं मात्र पसंत पडल्या नाहींत हें कांहीं विलक्षण नव्हे. मातोश्रीस कन्येशीं होणाऱ्या असभ्य वर्तनाबद्दल पराकाष्ठेचें दुःख झालें व तें सहन न होऊन दीन वाणीनें बेगम साहेबांनीं सर लिपेल कडे धांव घेतली व पुढें भेटी न घेण्याविषयीं विनवणी केली. या संबधानें पत्रव्यवहार झाला त्यांतील एका बेगम साहेबांच्या पत्राचें भाषांतर आमच्या ह्मणण्यास बळकटी आणण्यासाठीं खालीं देतों.:—

"आज मित्ती पर्यंत या दरबारांत पूर्वापार चालत आलेल्या रीतिभातीस अनुसरून सुलतान जहान ( बेगमची कन्या ) आणि तिचे पती हे उभयता बड्या बड्या अधिकाऱ्यांच्या ( रेसिडेंट आणि पोलिटिकल एजंट यांच्या ) मुलाखतीसमयीं आम्हा समवेत असत. कैलासवासी आमच्या मातोश्रीच्या कारकीर्दींत आम्ही भावी तख्ताधिकारी असून ही फक्त आईसाहेबांच्याच भेटी आफिसर गृहस्थ घेत असत. लौकिकी संप्रदायांत अनभिज्ञ व तरुण गृहस्थांस अशा भेटी पासून एके प्रकारचा मनोविकार होतो त्या पासून त्यांचें कल्याण नसून त्यांची पापवासना असल्याविषयीं लोक कल्पना करूं लागतात आणि दरबारच्या हितास अपायकारक अशा खोट्या वदंता उठवितात"

ह्या विज्ञप्तीस रुकार न देतां व लोक काय बोलतील त्याकडेही लक्ष्य न पुरवितां सर लिपेल यांनीं आपला क्रम पूर्ववत चालूं ठेविला. सन १८४२ सालीं आफगाणिस्थानांत इंग्लिश लोकांची कत्तल उडण्यास कांहीं युरोपियन आफिसरांचें अफगाण कुलीन स्त्रियांशीं असभ्य वर्तन कारणीभूत झालें होतें. वरील कृतीही ह्या उदाहरणा सारखी आहे. प्रस्तुत गोष्टींत पाश्चात्य कल्पनेप्रमाणें सर लिपेल साहेबांचें आचरण शुद्ध ह्मणतील तर

...ोत पण हा व्यवसाय निंदास्पद नसून ...ध्य आहे ह्मणून सिद्ध करण्यासाठीं व्यर्थ ...रिश्रम यत्न करून पहाण्याचें साहेब ह्या...स प्रयोजन नव्हतें.

सर लिपेल साहेब हे गेल्या शुक्रवारीं एवर्षांच्या फर्लोवर विलायतेस जाण्यास निघाले साहेबांचा परत येण्याचा विचार असला ...वा नसला तरी ते पोलिटिकल एजंट पुन्हां राहणार नाहींत असें लोक बोलतात. ...कांच्या म्हणण्या प्रमाणें घडून आल्यास ...सा वाचून दैव पावला असें मानतां ये...ल.

## होळकर सरकार व दिवाण रघुनाथराव.

होळकर सरकारचे दिवाण आर. रघुनाथराव हे आपले कामाचा राजिनामा देऊन मद्रासेस परत गेले आहेत. अलिकडे इंदूर संस्थानची व्यवस्था चांगली नाहीं असा बोभा... थोडाबहुत आज दोन वर्षे ऐकत आहों. आणि पुढें हळूं हळूं राजकारस्थानें, व राज्यकारभारांत फेरफार होत जाऊन घोटाळा अवेकाविक झाला व होतां होतां अंवे नग...ी व झोटिंग पादशाहीचा फासे उठतो ...काय अशी भिती वाटूं लागली ... आहे. ह्या ...णीच्या वेळीं दिवाण बहादूरांनीं होळकर स...कारास शेवटचा सलाम केला व त्या ...विषीं प्रथमारंभीं विशेष गडबड झाली नाहीं किंवा दिवाण साहेब जाणार अशाबद्दल पूर्वीं कांहीं बातमीहि पसरली नव्हती. यामुळें हें काय गूढ आहे व असें होण्यास कोणतें मोठें कारण झालें आहे याबद्दल अद्याप खात्रीलायक कांहीं कळलें नाहीं.

होळकर दरबार इतकें बिघडण्याचे कारण असें सांगतात कीं होळकर सरकार व मुत्सद्दी मंडळी यांचा सलोखा नाहींसा झाला व त्यांचा अन्योन्य प्रेमभाव नष्ट झाला. अर्थात उभयतांचें एकचित्त न राहिल्यामुळें राजा व प्रजा यांचा संबंध उरला नाहीं व एकमेकांचीं मनें दूषित होत गेलीं आणि एकमेकांस परस्परविषयीं संशय येऊं लागला हा स्थिति खरोखर असेल तर झालें आहे हें फार थोडें आहे असें दिसून येईल. होळकर सरकारास वाटूं लागलें आहे कीं आपली अधिकारी मंडळी आपली अंतस्थ व्यंगें लोकांपुढें मांडतात व प्रसंगविशेषीं वर्तमान पत्रांतून जाहिरही करितात. होळकर सरकारचा हा समज निराधार असेल किंवा नसेल याबद्दल आह्मांस कांहीं ह्मणणें नाहीं. पण कोणताही एक प्रकार असला तरी अशा अंगलट येणाऱ्या गोष्टींचें निराकरण करण्याचा त्यांचा मार्ग गैराशिस्त आहे. आणि त्यामुळें लोकांचीं मनें अधिक दुरावली जाऊन उलटपक्षीं होळकर सरकारास उत्तरोत्तर विशेष त्रास होत जाईल. सर्पं सर्पं असें ह्मणून सर्वत्र एक सारखें ठोकीत सुटण्याचा प्रकार अर्धवट शहाण्या मनुष्याच्या हातून होत असतो तशांतला मासला आमच्या होळकर सरकारच्या हातून घडून आला असेल तर त्यांनीं थोडक्यांत सावध होऊन राज्यकारभार नीट सुयंत्र चालेल अशा व्यवस्थेस लागावें. होळकर सरकारचे प्रस्तुत ...े खाजगी मंत्री चांगले असतील असें सत्यां दिवाणबहादुरांशीं झालेल्या बेबनावावरून खात्रीनें सांगतां येत नाहीं.

राज्य लक्ष्मीचें वैभव आलें आणि अंगामध्यें मकरध्वजाचें वारें शिरलें म्हणजे राजेलोकांच्या पुरुषांस लोकां कडून चांगलें म्हणवून घेणें फार फार प्रयासाचें काम आहे. माणसें एकेक जवाहिराचे तुकड्या सारखी दौलतींत जमा केलीं आहेत तर वडिलांनीं संपादलेल्या हरएक खानदानी लोकांचा परामर्ष घेऊन त्याच्या म्हणण्या प्रमाणें पाऊल रतीभर ही इकडे तिकडे पडूं नदेतां वागलें असतां उभय पक्षीं चांगलें आहे. दिवाण रघुनाथराव हें एक शहाजोग रत्न आपणांस मिळालें आहे त्यांचा आपण दुरुपयोग करूं नये अशी आपणांस सविनय प्रार्थना आहे. दुःखांत सुख मानण्या सारखें ऐवढेंच आहे कीं राव बहादुर रघुनाथराव हे पूर्ववत दिवाणगिरीचें काम पाहूं लागण्याची आशा अद्याप तुटली नाहीं. मद्रासेस त्यांनीं मित्र मंडळीस घरीं परत येण्याचें कारण सांगते वेळीं उत्तर अगदीं मोघम व संदिग्ध दिलें आहे त्यावरून रुसवा रुसवीचा प्रकार असावा असा अंदाज आहे. बाळा साहेब होळकरांनीं राज्य भार चालविण्या साठीं आपल्या ... कारकते सर... ...च्या मातोश्री, चुलते काशीराव आणि खुमानसिंग बक्षी या तिघांचें कौन्सिल नेमिलें आहे. ह्या कौन्सिलच्या मदतीनें तरी होळकर सरकारांस संस्थानची वस्तुस्थिति कळून येईल व ते थोडक्यांत आपला वर्तनक्रम बदलून प्रजेस सुखी ठेवतील अशी आम्ही उमेद बाळगितों.

## The Berar Samachar

MONDAY MAY 7, 1888.

### THE MOHAMEDAN MEETING AT MADRAS.

At the Mohamedan meeting which was held at Madras under the presidency of the Son-in-law of the Arcot prince to express their sympathy with the movements for the expression of loyalty to the retiring Viceroy several resolutions have been passed expressing the deep debt of gratitude which the Mohamedan community owes to Lord Dufferin. The meeting expresses its disapproval of the opposition at Calcutta to any demonstration in favour of the Viceroy & its approval with Sir Ahmad's views. The list of resolutions embraces *seriatim* almost all the current controversial points between the Hindus, and Mohamedans, and affords a curious food for reflection.

It is undoubtedly quite natural, if any section of the community feels itself indebted to Government and its responsible head, that it should express its gratitude. The Mohamedan community which was represented in the Madras meeting felt it their duty to express such gratitude. But may we ask what has been done by Lord Dufferin specially to promote the interests of the Mohamedan community, so as to deserve this tribute. The Mohamedans, from various causes, have been thrown backward in the race of life; and they are being daily awakened to a sense of their position, and to remedy the evils of that position. But what particular measure has issued from the Government of India so as to prove an important boon to the Mohamedans' ...f his wo... often ... greater ... higher ... than ... fth ... Interested people have been trying to work up the Mohamedan community with the belief that the interests of Hindus and Mohamedans were distinct and opposed to each other; and it would appear that this opinion has taken hold of certain well-meaning though credulous members of that community. In our province there has never been a clash between the two classes, and there is the least chance of there being one; but it is undoubtedly better that both the classes should properly understand their own interests so as to see if any real divergence exists between the two.

In matters political there is really no opposition of interests at all. We are all under foreign sway and the bitterness of religious antagonism between the classes has long since disappeared. Religious differences were indeed the fruitful source of ill-feeling between the two classes; but as neither class is now dominant, complete religious toleration now prevails. We stand, politically speaking, on the same grounds. When we ask for elective legislative councils or for certain concessions in the matter of throwing open more freely the Civil Service of this country to the natives thereof, we are asking for rights that both classes ... the most unlikely. It may be that there are ... value equal... and lightest moment very few just at the presen... fully ... competent to ... Mohamedan gentlemen ... go into the legislative Councils or that very few Mohamedans could take advantage of concessions if made regarding the Civil Service. But that is nearly an accident and must disappear in course of time. When the nation demands to send representatives in the legislative bodies, on the elective system, nobody supposes that Hindus alone could get into the Councils. Rules could easily be so framed as to admit representatives of all important sections of the communities in India. Of course competency will be one of the necessary qualifications to get into the Councils and as the Hindus form the majority of the nation and are admittedly more advanced they will naturally send in a larger number of representatives to the Councils that is to say if the privilege of election be conceded. So also in the matter of the Civil Service. The Hindoos being more advanced generally, would probably take greater advantage of the concessions that might be made in that direction; but all that, as we have already stated, would be a mere accident. With the general rise in status of the Mohamedans they will have more of their number taking advantage of any concessions made by Government. The Parsees are more advanced, generally speaking, than the Hindus; but it would evidently be absurd to have one set of illiberal rules for them, a liberal one for Hindus and a very liberal one for Mohamedans. If this view is taken and this is the view that will be taken by persons of liberal minds, there is really no clash of interests.

The Mohamedan community, is on the whole, admittedly backward. Circumstances have moulded the Hindus into what they are and they were prepared to take advantage of the benefits of education under the British rule; a different set of Mohamedans have made the Mohamedans what they are and they have not been able to take full advantage of the general education although the facilities to both classes were alike. In Berar, indeed, special scholarships in the High Schools have been intended for encouraging Mohamedans but even now very few take advantage of them. In order that the condition of the community might be bettered, it is nec... benevolent persons like Kaz... as a whole, ...ddin should come forward ...essary that ...cificent offers for the establis... Shahbu special encouragements to Mo... ...h muni students. But Government ...ment of ...cently go out of the way ...hamedan help a community if bac... cannot de... must be men from ... very long to itself to create spec... ...kward. There bettering of the comm... the community the tone of the com... ...ial aids for the proved, the Moha... ...unity. As long as cannot take full a... ...munity is not im... cessions by Gover... ...medan community the leaders of th... advantage of the con... look to special aids... ...nment. But for this, effects in due cou... ...t community must

Now to com... ...to create the desired to the expressi... ...rse of time. opposition at C... to the next point as stration in f... ...on of disapproval of the What is the ... ...alcutta to any demon- government? ...vor of Lord Dufferin. to be answered ...st rational view of his otherwise becom... his question will have monstration in ...efore the propriety or Viceroy. It ...ues apparent of any de- Lord Ripon ... favor of the retiring able circumst... must be admitted that Viceroy. H... ...ted under far more favor vantage of ha... ...nces than the present in England t... regime enjoyed the ad- self G... ...ving a Liberal ministry ... to support it and the Local ... Government scheme which popularised him so much with the Indian people was a boon the like of which could not be given by his successor in office. Whatever might have been the good intentions of the present Viceroy he could not bring in a measure equally popular within the short period of his office. The popular voice demanded a right of sending elected delegates to the legislative Councils but with a conservative ministry in England there was no hope of any such concession being granted. The people naturally comparing the two regimes found nothing of equal importance to the nation as the Local Self government scheme. In judging of the policy of the present Viceroy, it will always have to be remembered that statesmen of Lord Dufferin's type who have to govern large dependencies like India are controlled by the politics in England; and consequently a greater portion of the blame of the Burmah War and the additional heavy taxes it has entailed on the people at large, lies more at the door of the British public ...e, resented by the ministry now in office than a Lord Dufferin himself. In imperial matters the Viceroy has to bow to his instructions from home and it is hard that a man should be blamed for a policy which did not emanate from himself but in a sense, forced upon him by circumstances. The vested interest of Manchester and Liverpool millionaires in England also make it impossible with the present current of English feeling to reinstitute the import duties on cotton goods. There was thus hardly any scope for the present Viceroy to do substantial good to the nation. All this however only goes to show that the Viceroy can not be blamed much for not doing something for the national weal; but it can not justify any demonstration in his favor. If demonstrations are to have any value, they had better be sparingly made. As on the one hand it would be wrong to blame the Viceroy for certain things done and certain others not done, it would also be wrong to make a special demonstration in favor of a Viceroy who can lay claim to have done no special good to the people in India.

## DESULTORY READING.

(continued from the last nnmber.)

He must not be a loiterer, shuffling out of the trouble to which his more methodical comrades put themselves He must have an object in view and he must not allow himself to lose sight of it. We are not to confound desultory work with idleness. It is useful to look to the origin of words. The word desultory is of Latin parentage, and it is applied by the Romans to describe the equestrian jumping actively from one steed to another in the circus, or even, as was the case with the Numidians, in the midst of battle. That certainly was no idle loitering. It was energetic activity, calculated to keep the mind and the body very much alive. Indeed, that should be the spirit of the desultory reader. His must be no mere fingering of books without thought how they are to be turned to account. He may be wise in not allowing himself to become a book-worm but he must take care not to become what is much worse a book butterfly. Whatever is worth doing is worth doing well, and it is possible so to regulate and pursue a seemingly desultory course of reading as to render it more truly beneficial than an apparently deeper and severer method of study. This world of ours is an old world, full of the works and records of many generations. We are in daily contact with the fragments of the past with traces here and remains there which attract our attention, either for their intrinsic beauty or utility, or as indications of the manners and habits of mankind in former ages. Among these records assuredly there are none which are of greater interest or of higher value than the records, mere fragments though they may often be, of human history and human thought which are to be found in books. The poet tells us how we may so read the great book of nature that the trees, the stones, the running brooks, may set lessons which may profit as much as sermons. But while cordially accepting this teaching, we may observe that the trees and the brooks would hardly convey all those useful lessons to us if we had not a considerable knowledge of books to begin with. The lover of nature will find much revealed to him which the mere book-worm will fail to notice; but, on the other hand a well-read man who can apply the teaching of his books to the objects which he has around him, will profit far more than his illiterate companion. We do not, however, desire to dwell on what may be considered little more than a truism. What we wish to point out is that so great is the mass of our book heritage that it is absolutely impossible for any one, and doubly impossible for us, who have other engagements in life, to make himself acquainted with the hundredth part of it. So that our choice lies for the most part between ignorance of much that we would greatly like to know, and that kind of acquaintance which is to be acquired only by desultory reading. When we say this we do not forget that a third alternative may be offered to us. We may be told that though we have not time to read the books themselves we have always the means of be coming acquainted with their contents by the aid of abstracts, abridgments, and other convenient instruments for the close packing of information. No body is more ready than we are to acknowledge the utility of these pieces of intellectual mechanism. They are most valuable for reference, and are often indispensible for saving time. But to regard them as equivalent to, or even as a decent substitute for, the books themselves would be a fatal error. They serve the purpose which is by a dictionary, and if, as Charles Lamb maintains, dictionaries are not to be reckoned as books, so neither are these compressed masses of information to be admitted to that honourable title. We may h... sion to return to this point and ... the ... remarks on the question of a reader wit... ...ures. When we ... ourselves disappoi...

cramming, but for the moment our object is to eliminate this kind of false study from the comparison which we are anxious to draw between the sustained and the desultory methods of true study. With regard to those two methods we will in the first place, observe that, to speak generally, the world has need of them both. We need students who will give themselves up to strictly limited subjects of study, will pursue them with all their heart and mind and strength, and with that great kind of devotion which we may call student's love. There must be men animated by the spirit of our old giants of learning of whose powers of reading we hear so much, and of whose writings we see remaining so many substantial proofs. Yet even with these men the intermixture of some general and desultory reading is necessary, both for the very purposes of their study and in order to relieve the strain of the mind and to keep it in a healthy condition. We forget who the great Judge was who, being asked as to his reading, answered that he read nothing but law and novels. But here is plenty of Literature besides novels and besides the Arabian Nights which will be good for the relaxation of the mind after severe study, and we venture to think that the more miscellaneous our selection is the more agreeable, as well as more profitable it will be. So much for the consideration of one's own mental health, but beyond that we think, it is evident that a certain amount of miscellaneous reading is of great importance to the student in relation to his main study itself. Illustrations of his work will be presented to him often from the most unexpected quarters, will sometimes cheer and lighten his labour, and sometimes very usefully supply hints for further or wholly different lines of inquiry. As we said just now, for incuctive reasoning we need a wide field where we may pick up materials which may suggest new starting-points in the process of discovery. The student who is also something of a man of the world will often go further than the man who shuts out the light of day that he may give himself wholly to his folio and his lamp:—

"Study is like the heaven's glorious sun,
"That will not be deep-searched with saucy looks:
"Small have continual plodders ever won
"Save base authority from other's books.

(to be continued.)

## वऱ्हाड.

सन १८७८ सालच्या पहिल्या अक्टांतील तिसरे कलमान्वयें खटले चालविण्याचा अधिकार रा. रा. वामन गणेश बाळापूरचे तहशीलदार आणि दुसरे वर्ग माजिस्ट्रेट यांस अलिशान रेसिडेंट साहेबांनीं दिला असल्या विषयीं गेल्या रे० आ० वरून समजतें.

गेल्या महिन्याचे तिसरे तारखेस उमरावस हायर व लोअर स्टांडर्डची परीक्षा झाली तींत पसार झालेल्या अफिसरांची नामावळी विषयावर येणे प्रमाणें:—

हायर स्टांडर्ड—मि. गोविंदराज मुदलियार तहशीलदार हे सिव्हिलला मध्यें, आणि मि. मुबारक अली तहशीलदार व मि. शापूरजी विरजी तहशीलदार हे उभयतां आकाऊंटस मध्यें पसार झाले.

लोअर स्टांडर्ड—मि. आर म्माकृगिल एक्ट्रा असि. कमिशनर व मि. कृष्णाजी महादेव क्लार्क डेपुटी कमिशनर कचेरी उमरावती हे सिव्हिलला मध्यें, मि. वामन गणेश तहशीलदार हे अकाऊंटस मध्यें, आणि मि. गणेश गोपाळ आफि० क्लार्क आफ कोर्ट डेपुटी कमिशनरचें आफिस वाशिम व मि. सैफुद्दीनलाल खान डेपुटी क्लार्क डेपुटी कमिशनरचे कोर्ट वणी हे सिव्हिलला मध्यें पसार झाले.

मुदस्त सालीं आक्टोबरच्या परिक्षेंत वरील गृहस्थ ला, रेव्हिन्यू, व्हर्न्याक्युलर, व अकाऊंटस या चार विषया पैकीं बाकीच्या आपापल्या तीन विषयांत उतरले असल्या मुळें गोळा बेरजेनें अनुक्रमें हायर व लोअर स्टांडर्ड मध्यें पसार झाले आहेत.

मि. विश्वनादं मुदलियार आफि० एक्स्ट्रा असि० कमिशनर जिल्हा वणी यांस तिसरे वर्ग माजिस्ट्रेट नेमिलें अहे आणि त्या प्रमाणें त्यांच्या कोर्टांत ५०० रुपयां पर्यंत दावे चालतील.

मि. एच. एफ. काटग्रेव्ह पोलिस सुपरीनटेंडंट बुलडाणा यांस एप्रिलचे १८ तारखे पासून अथवा ते घेतील त्या तारखे पासून ६३ दिवसांची हक्काची रजा मिळाली आहे. त्यांच्या रजेंत मि. एफ् अगर पोलीस इनस्पेक्टर वर्ग पहिला हे बुलडाणा जिल्ह्याचें काम पाहतील.

रा. रा. श्रीकृष्ण नरहर आणि रा. रा. विश्वनाथ नारायण दांडेकर यांस स्माल कार्टाचे जज्जाचे अधिकार देण्यांत आले आहेत. त्या अन्वयें ते उभयतां अनुक्रमे तेल्हारा कोर्ट आणि वाशिम व मंगरूळ तालुक्यांत ५०० रुपये पर्यंत दावे चालवितील.

गतवर्षीं जळगांव तालुक्यांत महार लोकांनीं मंत्र सामर्थ्यानें एक रुपयाचे दोन रुपये करण्याचे थोताड माजवून लोकांपासून जे हजारों रुपये मिळविले त्यांपैकीं सुमारें २५००० रु० सरकारांत अनामत जमा आहेत असें समजतें. हा पैसा ज्याचा त्यास मिळावा असा सरकारचा हेतु आहे व ह्मणूनच त्यांनीं तो अनामत ह्मणून ठेविला आहे लोकांनीं कोणत्याही प्रकारची भीति मनांत न आणतां आपल्या पैशाची मागणी करण्यास मागें पुढें पाहून तो विनाकारण सरकारचे घरांत जाऊं देऊं नये. ज्या ज्या गांवांत हा कपटाचा व्यवहार झाला तेथील पाटील पटवारी यांनीं लोकांस हें सर्व नीट समजून सांगून आपला पैसा घेण्या करितां त्यास पुढें येण्यास सांगावें व सहाय करावें.

## जाहिरात.

सर्वत्र लोकांस या जाहिरातीनें खालीं सही करणार यांजकडून असे. जाहीर केलें जातें कीं, मुंगतीराम गोंदुराम मारवाडी यांच्याशी कोणी कर्ज रोख रुपये देऊन घेऊं नये. याज प्रमाणें खातें बाकीचे येणें व शेतीचा माल व गल्याची देवघेव वगैरे आमच्या समंती शिवाय कोणी ही करूं नये. जर कदाचित कोणी केल्यास सर्व देवघेव वगैरे सर्व भरून घेतले जाईल. ह्मणून दिली जाहिरात. ता. ६ मे सन १८८८

( सही. )
गोगाबाई जवजे रामप्रता पजी
दुकान सांगवी निशाणी
बांगडी.

### नोटीस.

हरजसराय मोतीराम दुकान थुंगांव व नथमल भागीरथ घानुक दुकान खामगांव यांसः—

खालीं सही करणार यांच्या कडून असें कळविलें जातें कीं, तुम्ही उभयतांनीं मिळून माझी खात्री करून माझे गांवीं येऊन रोख रुपये आदमासें ( १०००० ) दाहा हजारचे मुंगतीराम यांस देवविले. यांस आदमासें तीन चार महिनें होत आले. परंतु आज पावतों सदरील रकम्यांच्या पैकीं जो वसूल झाला आहे तो आपण आम्हास दिला नाहीं. तर आपल्यास नोटीशीनें असें कळविलें जातें कीं, जो वसूल आला असेल तो व बाकीचे रोख आठ दिवसांत आणून द्यावेत. न दिल्यास रीती प्रमाणें काम चालून अखेर निकाल होईपर्यंत जे नुकसान होईल तें सर्व भरून घेतलें जाईल कळावें.

तानाकलम याज प्रमाणें नथमल भागीरथ यांच्या जवळ आमची रोकड रुपये २००० आहेत ते ही त्याणी आठ दिवसांत आणून द्यावेत. न दिल्यास सदरीं लिहिलेली तमवीज केली जाईल. कळावें. ता. ६ मे सन १८८८

( सही. )
गोगा बै जवजे रामप्रताप दु॥ सागवी
निशानी बांगडी.

### नोटीस.

सावतराम रामप्रसाद दुकान दहीहांडा यांस.

खालीं सही करणार यांच्या कडून असें कळविलें जातें कीं आदमासें तीन महिने झाले तुम्ही आमचे गावीं सांगवीस येऊन रुईचे बोजे ७ सात व नगदी रुपये ३०० तिनशे व खुर्दी रुपये ५० पन्नास चा व आजमासें चांदीचें डागिनें रुपये ६०० सहाशेचे असे सर्व मिळून तुम्ही मजला खात्री देऊन मुगतीराम गोंदुराम यांस देवविलेत त्यांत बोजे रुईचे ७ सात पैकीं तुम्ही काय ते रुपये २०० दोनशे दिलेत आतां ह्या नोटीशीनें असें कळविलें जातें कीं, बाकी राहिलेले डागिनें रुपये ६०० शे व रोकड ३०० शे खुर्दी रुपये ५० चा असें सर्व मिळून नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत आणून देऊन निकाल करावा न केल्यास रीती प्रमाणें अखेर निकाल होई पर्यंत सर्व नुकसान होईल त भरून घेतलें जाईल म्हणून दिली नोटीस. तारीख ६ मे सन १८८८ इसवी.

( सही. )
गोगाबाई जवजे रामप्रतापजी निशानी
बांगडी.

## वर्तमानसार.

सन १८७४ सालच्या 'टाईम्स आफ् इंडिया' पत्रांत अलाहाबादेहून एका गृहस्थानें इंग्रजींत पत्र लिहिलें आहे त्यांतील वाक्यांचा भावार्थ असा आहे कीं "मुख्य अधिकारी लोक डोंगरावर हवा खाण्याकरितां जातात व वर्षांतून आठ महिने पर्वतों 'बाडमिंट' खेळत असतात. ते आपल्या बरोबर हाताखालचे लहान लहान अधिकारी नेत नाहींत; व या लहान मंडळीस कांहीं काम नसल्यामुळें जें काम असतें तेवढ्यांतच ते नानाप्रकार करितात; ह्मणजे चाकूनें नखें कोरीत बसतात. व कधीं कधीं एखादी "ताकीद" पाठवितात. सारांश, जसा जसा मोठा पगार व कचेरींतील लोक पुष्कळ तसें तसें अधिकाऱ्यांच्या हातून काम कमी होतें. अशा प्रकारचे रिकामटवळे डोंगरावर जमले ह्मणजे ते सरकारला मदत करण्याकरितां येतात असें ह्मणतात. हिंदुस्थानामध्यें राज्य करण्याची शैली ह्मटली ह्मणजे थोडेबहुत रिकामटवळे अधिकारी नेमावे व त्यांनीं मग हाताखालच्या मेहनती लोकांपासून मरेमरेंतों काम घ्यावें ही होय. तसेंच डोंगरावर 'बाडमिंट' खेळण्यास ज्याला जास्त फुरसत मिळेल त्याला जास्त पगार देत जावा. या प्रमाणें अधिकारी लोक डोंगरावर राहतात; तेणेंकरून सरशेवटीं इंग्लिशांना या मुलखांतून आपलें राज्य घालवावें लागेल कीं काय अशी धास्ती पडते. गव्हरनर साहेबांनी कौन्सिलांत पब्लिकवर्क्स खात्याकरितां नवीन मेंबर नेमला आहे त्याला पहिलें काम असें सांगितलें पाहिजे कीं हे दुष्ट डोंगर खबडतोब जमिनीच्या सपाटीबरोबर मिळवून टाकावें, ह्मणजे----जे रिकामटवळे डोंगरावर जाऊन बसत असतात त्यांचे चांगले डोळे उघडण्यास आपल्याला संधि सांपडेल." हें चित्र हुबेहुब उतरलें आहे आणि या चित्राची मूळप्रत अधिकाऱ्यांनीं नेहमीं सुधारून पुन्हा फोटोस बसून या पेक्षा अगदीं भिन्न निराळी तसबीर जगापुढें ठेवण्याचें मनांत वागविल्यास प्रजेचें कल्याण होणार आहे. या वरील उताऱ्यांतील कांहीं मुख्य मुख्य लक्षणें डोंगऱ्यावर गांवोगांव फिरणाऱ्या वरिष्ठ वरिष्ठ अधिकाऱ्यांच्याही अंगीं ईश्वरीवैभव हाताखालील लोकांस दाखविते वेळीं दृष्टीस पडतात. ते ते अधिकारसंपन्न गृहस्थ हें चित्र पाहून ओशाळल्यास आह्मांस त्यांचा अंमल अधिक सुखावह होण्याची विशेष उमेद येईल.

मध्यएशिया रेल्वे लाईन मर्व्ह आणि समरकंद येथपर्यंत परस्पर जोडली व तिचे सुरुवातीचा समारंभ मेच्या २७ व्या तारखेस होण्याचें ठरलें आहे.

हिंदुस्थांत इंग्रजांस साधारण दरारा दाखविणारे असे दोन तीन उत्तर हिंदुस्थानांतील संस्थानिक होते. गायकवाड, शिंदे आणि होळकर, पैकीं पहिल्या संस्थानिकानें तर आपले कावडींची किल्ली दुसऱ्याजवळ देऊन विलायतेचा मार्ग सुधारला दुसरे संस्थानिक अजून अज्ञान आहेत तरी त्यांचे गंगाजळींत फक्त जळच राहिलें आहे. बाकी राहिले होळकर. हल्लींचे होळकर फार हुषार असून फार बाणेदार आहेत पण तिकडे यांच्या मानेवर सर लिपिल ग्रिफिनरूपी भूत बसल्यामुळें त्यांनीं तर आपला राज्य कारभार पहाण्याचें सोडूनच दिलें आहे. आतां समजतें कीं होळकरच्या प्रधानांनीं आपल्या जाग्याचा राजिनामा दिला आतां मात्र सर लिपिल ग्रिफिनास आपला हात सुरू करण्यास बरेंच फावेल. ठा० अ०

कान्स्टानटीनोपल येथें ख्रिश्चन व मुसलमान धर्मी लोक यांची मोठी मारामारी होऊन ६०० मुसलमानांची ख्रिस्ती लोकांनीं कत्तल उडविली. ख्रिस्ती लोकांस पकडून अटकेंत ठेविलें आहे. न्या. सिं०

जाहिरातीचा राक्षसी खर्च---हैद्राबाद संस्थानांतील खनिजपदार्थ काढण्यासाठीं जी कंपनी स्थापन झाली आहे व जिच्या संबंधानें कांहीं किटाळ उत्पन्न होऊन अबदूल हक्क निजाम सरकारचे एक कामगार सस्पिंड झाले आहेत त्या कंपनीच्या जाहिरातीसाठीं ४००० पौंड खर्च झाला असें एका पत्रांत लिहिलें आहे. हें खरें कीं खोटें! श० सू०

हैद्राबाद संस्थानास कर्ज बरेंच असल्याकारणानें तें फेडण्याकरिता निझाम सरकारांनीं पाउण कोट रुपये कर्ज काढण्याचा विचार केला आहे असें समजतें. इतकी संस्थानची जर हलाखी आहे तर निझाम साहेबांनीं सरहद्दीच्या संरक्षणार्थ दरसाल २० लक्षाचे तोंडे कोणत्या आधारावर देऊं केले असतील ते असोत. ही देणगी खुद्द निजाम साहेबांनीं आपण होऊन देऊं केली नाहीं परंतु कोणाआग्रहावरून ही गोष्ट झालेली आहे आतां जो कित्येकांनीं अदमास काढिलेला आहे तो खोटा नसावा असें दिसतें. ब०

हिंदुस्थानांत एक भाषा आणि ती पुन्हा इंग्रेजी—देशभाषा करून सोडावयाची ह्मणजे सहरा अरण्यांत रायगडा वरील गंगासागराच्या पाण्यानें बाभळींचा बगीच्या उठवून देण्याचें मनांत आणण्यासारखें होय! ज्या एका हिंदुस्थान देशामध्यें छपन्न लहान मोठे देश आहेत व जेथें पूर्वीं छपन्न भाषांचे छपन्न कोश असल्याची उपश्रुति व त्यांपैकीं कित्येक कोश आज उपलब्ध आहेत अशा विस्तीर्ण देश आंतील लोकांच्या कमकुवतोमुळें इंग्रजांसारख्या अत्यल्प लोकांनीं आज शें दोडशें वर्षे आपल्या ताब्यांत वागविला व आज त्याच्या अमलाची शाश्वती भासत आहे आणि लक्षावधि नेटिव लोक वेदासारखा इंग्रेजी भाषेचा अभ्यास करीत आहेत तथापि इतक्याच कारणसमुद्रायावरून सांप्रत या देशांत चालत असलेल्या मुख्य आठ दहा देशभाषा सफाई बुडवून साऱ्या हिंदुस्थानभर इंग्रेजी भाषेची स्थापना करण्याची अवश्यकता दिसत नाहीं! स० मि०

याचें नांव देणगी—विजयानगरचे महाराजानीं प्रसिद्ध नोटीस दिली आहे कीं, जो पुरुष हिंदुस्थास्थानांतील सर्व प्रकारचीं दुःखें विलायतेच्या राज्यधुरंधर लोकांपुढें जाऊन प्रगट करील त्यास ते राजे साहेब लागेल तो खर्च पुरविण्याची हमी घेत आहेत. आजपर्यंत अनेक लोकांनीं अनेक प्रकारच्या देणग्या दिल्या असतील, परंतु ही देणगी सर्वांत उत्तम समजली पाहिजे. देशाचा कळवळा दाखविणारानें अशी संधी जाऊं देऊं नये.

सरकारानें चोहोंकडून आमची पाठ पुरविली आहे. कराच्या टोळधाडी बसतच आहेत; सरकार मीठ तोंडीत आहे, तेलावर कर बसल्यामुळें आम्हाला दिव्याचा प्रकाश मिळण्याची मुष्कील झाली आहे; असा आमच्या सध्याच्या स्थितीचा रंग आहे. या संबंधानें इंदुप्रकाशांत एका बातमीदारानें सरकारचा धावा केला आहे. त्यांतील कांहीं पद्यें आम्ही आपल्या वाचका करितां या खालीं देतों:—

शार्दूलविक्रीडित.

स्वामी भक्त पहा दयाद्र अवघे ।
आम्ही असों आर्य हो ! ॥
ना ठावें लवलेश तें कपट कीं ।
जाणा मनीं आर्य हो! ॥
कोपाना! पवते प्रहार सहते ।
जैशी असे ही धरा! ।
तैसें वर्तन आमुचें सकल हें ।
आहे तुम्हाशीं स्मरा ! ! ॥ १ ॥
" यावच्चंद्र दिवाकरी " वरि करा ।
आह्मांवरी राज्य कीं ॥
अन्याची मनिषा नसे परि तुह्मां ।
होईल कां ! मान्य कीं ।
धर्मी आड न या, करा सम नया, ।
लाबा दया अंतरीं ॥
विद्या सांप्रतही नको, परि ।
" कला कौशल्य " द्या सत्वरी ॥ २ ॥

॥ आर्या ॥

सारा शेताचा हा ।
असह्य न खावया उरे धान्य ॥
जरि ध्याना चित्ता तें ध्या ।
सांग मग कींव कोण करि अन्य ॥ ३ ॥

॥ स्रग्धरा ॥

फॉरेस्टाचीं अरिष्टें निशिदिनि आमुच्या ॥
लावितां फार पाठीं ॥
आज्ञा ना गायरांनीं तृणहि कवळण्या
तोडण्या पान काठी ॥
बालां व्यास होई लवण सुखद तें ।
वाढविलें जयाला ॥
शक्ति ती आमुतें द्या पुनरपि सकला ।
वाढवा लेंकराला ॥ ४ ॥

॥ दिंडी ॥

जननि पोषण ना करा बालकाचें ।
जरी ना मन तें द्रवे तत्पित्याचें ।
दीनबाले तरि शरण कुणा जावें ।
सकल त्याचें मग जिणें कसें व्हावें ॥ ५ ॥

ठा० अ०

मंडलीक स्मारक—गेल्याच्या मागच्या शनवारीं, माधवबागेंत, रा. सा. विश्वनाथ नारायण मंडलीक यांच्या स्मारक कृत्याची व्यवस्था पहाणाऱ्या कमेटीची सभा भरून स्कालरशिप देण्याचा बेत बदलून सोनेरी पत्रक देण्याचा विचार ठरला. हें पत्रक संस्कृत ग्रंथाबद्दल निबंध लिहिण्याबद्दल द्यावयाचें. स्कालरशिपचा बेत युनिवरसिटीकडून सरासरी मान्य झालेला होता तो बदलून आतां नवीन प्रकार व्हावयाचा आहे.

फ्रान्समध्यें अलीकडे जनरल बोलांजर यांच्या संबंधानें विशेष हालचाल व्हावयास लागली आहे. राज्यक्रांतिचा समय आहे प्रजासत्ताक राज्यपद्धति मोडून पुनः राजसत्ता चालू होईल असेंही ह्मणतात. सु. प.

अतिशय जुनें सुतार काम—जगामध्यें अतिशय जुनें सुतारकाम नुकतेंच ब्रिटिश म्यूझियममध्यें आलें आहे. हें एक लांकडी सिंहासन आहे. हें चार हजार वर्षांपूर्वीं इजिप्ट देशांतील अठराव्या राजवंशावळींतील राजकर्त्या राणी करितां तयार केलेलें होतें. हें सिंहासन कोणी मि. जे.सी.हवर्थ नांवाच्या मनुष्यानें वरील म्यूझियम करितां मिळवून पाठविलें आहे. ह्या सिंहासना इतकें जुनें सुतारकाम जगामध्यें दुसरें कोठेंही नसेल. ज्ञा. च.

भवति भिक्षांदेहि:—

( श्लोक. )

मधुकरी स्वकरीं मिरवूं जरीं
सुखकरी न धरी समजा मनीं ॥
उदरमूर्तिस अन्य इलाज न
ह्मणुन वृत्तिस ह्या मानें लाज न ॥ १ ॥
भू तप्त खालीं वर ऊन लागे
जावें दुपारीं उवडेच लागे ॥
घेऊनिया चौपदरीं करांत
ही आमची नित्य निघे वरात ॥ २ ॥
मार्गीं करूं येति विटाळ किती
पोरें, कथूं काय कुटाळकी तीं ॥
उन्हामध्यें तापत टाळकी ती
ऐकून दुःखेंच विटाल की तीं ॥ ३ ॥
संपन्नसा पाहून थोरवाडा
जातां न कोणी उघडी कवाडा ॥
गेलों जरी आंत फळी बवा हे --
"झालीच" किंवा "अवकाश आहे!" ॥ ४ ॥
आंगावरी खसवसा जन कोणी येती
किंवाऽर्धशास्त्रनियमें उपदेशितातीं ॥
दुःशब्दपूर्वक असे तुकडे मिळावे! ॥
कष्टपूर्वक कसे हि कुठें गिळावे ॥ ५ ॥
श्रीमंत जन्मति अशांस न बोल कांहीं
माध्यान्हकालकटूताच तयास नाहीं. ॥
हा आमची परि जया अनुभूत वृत्ति
सपन्न ते असुनि कां न दयार्द्र चित्ति ॥ ६ ॥

—कटाक्ष—

आमचे इकडील राजे रजवाडे लोकांनीं पुरातन वैद्यशास्त्राच्या शाळा आपापल्या राजधानी मधून स्थापन करून जुने ग्रंथाधारें शिक्षण चालू करतील तर देशास अमोल लाभ मिळून स्वदेशाचें हित केल्याचें श्रेय मिळणार आहे. कित्येक ह्मणतात लोक सुज्ञानी होत चालले परंतु जोवर असल्या उद्योगाची प्रवृत्ति देशांत चालू होणार नाहीं तोंवर आह्मी सुधारत चाललों असें ह्मणता येणार नाहीं. म. मि.

सर लिपेल ग्रिफीन ह्यांनीं भोपाळ संस्थानाशीं ठेवलेल्या वर्तनाचीं कागदपत्रें आमच्या अमृतबझार पत्रिकेंत उघड छापून प्रगट केलीं असतां आमचे लार्ड साहेबांनीं त्याचा योग्य विचार न करतां ग्रिफीन साहेबांची उलट पाठ थोपटली आहे. दुर्दैव बिचाऱ्या संस्थानिकांचें. ते. मि.

आमच्या दृष्टीनें आमचे सरकारचा जो निरर्थक लष्करी खर्च वाढलेला आहे त्यासच आजकाल 'निमकहराम' हे अत्यंत निंद्य नांव देतां येईल. कारण गरीब हिंदुप्रजेचें मीठ तुटण्यास व तदभावीं त्यांच्या अभ्यंत माती कालवली जाण्यास जीं कांहीं कारणें आहेत त्यांत वाढविलेला हा खर्च हें विशेष आहे. या खर्चाचे बळावर आमचे सरकार आपल्या व्यापाऱ्यांची सोय करून घेतें, राज्यसीमा प्रवृद्धीची आपली हौस पुरवून घेतें आणि मधल्यामध्यें गरीब हिंदुस्थानाला उगीच भुर्दंड भरावा लागतो. असला धडधडीत अन्याय खुशाल खपला जातो हें मोठें आश्चर्य आहे.

☞ हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर ७ १८
किरकोळ अंक फास ........................०४
नोटिशी बद्दल,
१० ओळीच आंत रु. १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ..% ...०१

Six months ......... " 
Single copy ........................ 4 as

vertis ements.
Below 10 lines... .2Rs
Per line over 10...4as
Repetition perline...3


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.


VOLXXII AKOLA MONDAY 14 MAY 1888 NO. 19

वर्ष २२ अकोला सोमवार तारीख १४ माहे मे सन १८८८ इ० अंक १९


### जाहिरात.

सर्वत्र लोकांस मी खालीं सही करणार यांच्याकडून असें जाहीर केलें जातें कीं, मारुती वल्द अनंदा सोनार अंत्रजकर तालुके खामगांव जिल्हे अकोले यांस आह्मी आमच्या वतीने देववेव करणें सरकारांत फिर्यादी वगैरे चालविणें अशा सर्व कामाबद्दल सदहु गृहस्थास कुल मुक्त्यार नेमिलें होतें. परंतु अलीकडे त्यानें कुलमुक्त्यारीचे कामांत बरीच दगलबाजी केली व ती आमच्या नजरेस आली याज करितां ह्या जाहिरातीनें असें कळविलें जातें कीं आह्मी मारुती वल्द अनंदा सोनार यास मुक्त्यारीचे कामावरून ह्या जाहिरातीनें त्याचें मुक्त्यारपत्र रद्द केलें आहे. जर करितां कोणी या पुढें त्यांच्याशीं आमच्या संमती शिवाय कोणी देववेव करील तर त्याजबद्दलचे जबाबदार आह्मी नाहीं व मुक्त्यारपत्र आह्मी या जाहिरातीनें रद्द केलें आहे. ह्मणून दिली जाहिरात सही. ता. ८ माहे मे सन १८८८ इ०

(सही)

लक्ष्मी मर्द अंबादास सोनार
रहाणार अंत्रज तालुके
खामगांव जिल्हा आकोला नि. हातची
बांगडी असे.

---

### पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

---

मुक्काम वाशीम ता० ३।५।८८

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

कृतानेक सा. न. वि. वि. मागील पत्रीं कळविल्या प्रमाणें पोटांतील खटला ता. १-५-८८ इसवी रोजीं मिस्तर दाडेकर यांचें कोर्टांत निघाला होता. आरोपी कुपूस्वामी पोष्टमास्तर मि. बरन्स साहेब पोस्टाचे सुपरींटेंडेंट व मि० फेकनी साहेब डेप्युटी पोस्ट मास्तर जनरल यांच्या साक्षी दिल्या होत्या. परंतु खरें बोलणाऱ्या लोकांच्यानें खोटें कधींही बोलवलें जात नसल्यामुळें त्यांनीं खरें सांगितलें व जो पार्सलाबद्दल सदर त्रयीं मध्यें लेखी पत्रव्यवहार जाहला तो वाचला गेला. हा सर्व प्रकार आरोपी कुपस्वामी यांच्या विरु... व बिचा-

the whole of th
very inrt of Bairagarh ... ऑसिक्यु-
...opted a total cost of the ...चाऱ्या-
... the 1 to 17867-3-10 of
...d are on account of निका-
... wi ... महकून
... ear under repor ... दीड
...ontinued ... ct to amend the ... आ-
... Eceduae and ce
... the ... cal Authorities' ... रुपये
9 as amended by Act X
the sections 183 to 192 of कैद
...mbay land Revenue C... नि-
made applicable to Be...

...n- esent ... nci- ... on ... 5-...me ... ut the ... ave o ... o offer

काल झाला. कुपुस्वामी कारागृहांत पडलें. बा-कुप, तूं असें अघोर कृत्य करून अशा शिक्षेस पात्र कां करून घेतलेंस. सुखाची नौकरी करण्याचा तुला कंटाळा येऊन अशा अनीतीच्या मार्गाकडे अनुसरण्याची तुला कशी बुद्धी झाली. आतां बा तुझी नौकरी गेली, अब्रू गेली व पुढील सुखोपभोगास मुकलास. ह्यांच्या खटल्याकडे इतर नौकरी वरील पोस्टांतल्या नौकरांनीं लक्ष्य द्यावें. व बाबारो पैशाच्या भुलीस भुलूं नका हो. या खटल्यांत येथील प्रसिद्ध वकील रा. रा. यशवंत राव दिगे यांनीं डिफेंस चांगल्या रीतीनें मुद्देसुद दिला. सुमारें एक तास भाषण झालें. आतां त्यांस अखेरीस यश येऊन आरोपी सुटला नाहीं ही गोष्ट निराळी आहे. येथें यांच्या शिवाय आणखी तीन वकील आहेत. ते हशार आहेत परंतु ते मराठी ह्मणजे त्यास इंग्रजींत वकिली करितां येत नाहीं. बहुतेक फौजदारी भानगडीचे मुकद्दमे मि० दिगे यांचे कडे जातात. व ते हिमतीनें घेतात. हे नवीन दोन तीन वर्षांमध्येंच येथें आलेले आहेत. तरी ह्या थोडक्या काळांत आपल्या धंद्यांत ते चांगले प्रवीण होत चालले आहेत. व सरकारी कामदारांत व इतर लोकांत फार लोकप्रिय आहेत. ह्यांचा स्वभाव परोपकारी असून कोणतेंही काम करण्यांत ते लहरी नाहींत. कांहीं दिवसांनीं ह्या जिल्ह्यांत हे पहिल्या प्रतीचे वकील गणले जातील असा अदमास दिसतो. ईश्वर यांची भरभराट करो व हमेश यांस यांच्या धंद्यांत यश देवो.

येथील पोस्ट मास्तर हे २२ बावीस वर्षें पोस्टल खात्यांत नौकरी करीत आहेत. यांचें काम नेहमीं चांगलें असतें. हे आपले कामांत सरळ असल्या मुळें अप्रिय झाले आहेत. जो मनुष्य निस्पृह असतो तो बहुधा लोकांचा शत्रु होतो. असा सांप्रत सृष्टीक्रम दिसतो. त्या प्रमाणें हे कामांत वक्तशीर असल्या मुळें येथें आल्या पासून येथें अप्रिय होऊन बिचाऱ्याचे फार हाल आहेत. त्यांस त्यांचे हाताखालील मनुष्यें असे मिळाले आहेत कीं ह्यांचे नेहमीं वाकडें असतें. पारतंत्र्य मोठें कठिण.

आपला प्रेमेच्छु
"क्ष"

---

मु० पुसद ता० ५-५-८८

रा. रा. वऱ्हाडसमाचारपत्रकर्ते यांस

कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विशेष येथील हेडमास्तर मि० देशमुख हे पुण्याचे राहणार यांनीं येथें दोनवर्षें हेडमास्तरचें काम केलें व वरिष्ठास खुष केलें. सर्व लोकांशीं हे स्नेह भावानें वागत असत. यांची बदली चिखली जिल्हा बुलडाणा येथें झाली. त्यांस बढती मिळाली. यामुळें आह्मां पुसदस्थ लोकांस फार आनंद झाला. अशा सुस्वभावी मनुष्याचा वियोग झाल्यामुळें मात्र वाईट वाटते. त्यांचे जागीं कोणी दुसरे ओक नांवाचे गृहस्थ नेमिले आहेत. परंतु ते कसे आहेत हें अद्याप समजत नाहीं. कारण ते अजून आपले कामावर हजर झालें नाहींत. ते कसे काय मनाजोगे मुलांच्या व लोकांच्या उतरतात तें समजल्यावर कळवीन.

येथें रिकामी असलेली नायब तहसीलदारीची जागा भरली. त्या जागेवर रा. रा. लक्ष्मण गोपाळ देशपांडे अडगांवकर यांची नेमणुक झाल्या प्रमाणें हे गृहस्थ आपल्या कामी गेले महिन्यांत रुजूं झाले. हे प्रसिद्ध अडगांवकर देशपांडे यांचे घराण्यांतील असून यांनीं मुंबई युनिव्हरसिटीची म्याट्रीक्युलशनची परीक्षा पास झाली आहे. यांची वृत्ती शांत व स्वभाव मनमिळाऊ दिसतो. आतां आमचे पुसदस्थ लोकांचे मोठें सुदैवच समजलें पाहिजे कीं आम्हास तहसिल्दार व नायब तहसिल्दार या उभय मुर्ति फार सज्जन मिळाल्या आहेत. यांच्या पासून आमचे व आमच्या तालुक्याच्या लोकांचें कल्याण होवो असें आह्मी मनापासून इच्छितो.

येथें नवीन आलेल्या मनुष्यास राहण्यास जागा मिळत नाहीं यामुळें बिचाऱ्यांस फार हाल सासावे लागतात. ह्या अडचणीकडे येथील साहु मंडळी लक्ष देतील काय? त्यांनीं घरें बांधून भाड्यानें दिल्यास भाडें उत्पन्न होऊन लोकांचे हाल दूर होतील.

ह्या तालुक्यांत हजारो गुन्हे फार होतात किंबहुना सर्व जिल्ह्यामध्यें ह्याच तालुक्यांतील गुन्हे रजिस्टरांत अधिक दाखल होत असतील असें वाटतें. याचें कारण हा जिल्हा इतका डोंगराळ असून अडाणी लोकांस लपून राहून गुन्हे करण्यास संधी सापडण्यासारखें जंगल फार. अजून विद्याशास्त्राधीन हे लोक झाले नाहींत. विद्या आली कीं कोणता हा गुन्हा करण्याविषयीं मनुष्याच्या मनांत विचारच उत्पन्न होतो. तर ह्या तालुक्यांतील सुधारणा करण्याकरितां शिक्षण अडाणी लोकांमध्यें नबरीनें दिलें पाहिजे. फी कमी केली पाहिजे. व इतर प्रकारें उत्तेजन दिलें पाहिजे. लोभ कीजे कधीकधी भेट घेईन लोभ कीजे.

आपला पुसदस्थ
"क्ष"

---

शेगांव ता. ८—५—८८इ.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस

बेगार

वि. वि. आमच्या वऱ्हाडांत बेगारी हा शब्द लहानापासून थोरापर्यंत सर्वांस ठाऊक आहे. कारण बेगारीचा जुलूम ह्या प्रांतांत पूर्वीपासून आतांपर्यंत सारखा सुरू आहे ह्यांत कमतरता मुळींच होत नाहीं. ही बेगारी इतकी कांहीं प्रचारांत आली आहे कीं, बेगारी हा एक प्रकारचा जुलूम आहे. असें कोणासही वाटेनासे झालें आहे. आमच्या प्रांतातले त्रिचार कुणबी लोक भाबडे तर खरेच त्यांस कोणी कोणत्याही प्रकारें जरी वागविलें तरी ते बिचारे कधींही कुरकुर करीत नाहींत परंतु आमच्या अधिकारी लोकांनीं त्यांच्या ह्या गरीब स्वभावाचा फायदा बेगारी सारख्या नुचित व काळीमा आणणाऱ्या गोष्टींनीं करून घेणें हें फारच वाईट होय.

सुरजमल गिरधारीलाल, दुकान केळीवेळी तालुके अकोट खालीं सही करणार यान कडून नोटीस देण्यांत येतें कीं आमचे सो न्याचे दागिने अदमासे रुपये ३००० तिन हजारचे व तुमशी ज्वारी खंडी ४० चाळीस प्रमाणें सवदा झाला त्या ज्वारी बदल नुकसान रुपये ३२० व रोकडी घरोंड अनामत तुमच्या पाशीं ठेवलेले रुपये ५००० पांच हजार असे. एकंदर तुमचे पासून आह्मांस घेणें आहे तें सर्व नोटीस पासून आह्मांस देऊन आमच्या हातची पावती घ्यावी. असें न केल्यास रितीप्रमाणें तजवीज केली जाईल कळावें. तारीख १६ माहे सन १८८८ इ०

(सही)

झुंकीराम रामप्रताप
दस्तूर खुद



## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

मुक्काम रिसोड ता. १३-५-८८.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

कृतानेक सा. नमस्कार विनंति विशेष. मागे आपल्या पत्रांत येथील शाळेसंबंधीं दोन पत्रें छापलीं आहेत त्यावरून ह्या शाळेची स्थिति कशी झाली आहे हें आपलें लक्षांत येऊन चुकलेंच आहे. दिवसानुदिवस ह्या शाळेचें पाऊल सुधारण्याकडे न जातां मागेंच पाय आहे. शाळा हें गांवचे भूषण होय परंतु असें समजणारे लोक फार थोडेच. विद्ये वाचून कोणती ही सुधारणा होत नाहीं, सुधारणे वाचून लोक स्थिति चांगली होत नाहीं, लोक स्थिति चांगली झाल्या शिवाय देशाची सुधारणा होत नाहीं. देशाची सुधारणा झाल्या वांचून, भरभराट होणें ही आशाच नाहीं. ह्या गोष्टीवरून पहातां विद्या सर्व देशांत सर्व लोकांत सर्व काळीं पूर्व सुधारणांचें व सुखांचें आदीस्थान ... पर्यंत ह्या गोष्टी लोकांना समजत ... तो पर्यंत राज्यचालकांनीं त्या आपले रयतेस सामोपचारानें अगर कोणत्या तरी अन्य रीतीनें समजावित्या पाहिजेत. परंतु जो पर्यंत सरकार ह्या गोष्टी करण्यापासून पराङ्मुख आहे तोपर्यंत कांहीं होणें नाहीं. सरकारास सर्व व्हावयाचें ते होवावत व सरकारचा इष्ट हेतु लोकांना विद्यामृत प्राशन करविण्याचा तो मात्र सिद्धीस पावत नाहीं. मोठमोठ्या गांवीं व शहरीं जेथें लोकांना विद्येची अभिरुची आहे व जेथें लोक आपल्या स्वताहाच्या पैशानें ही आपल्या मुलांचें शिक्षण चालवितात अशा ठिकाणीं सरकार दुर्लक्ष करील तर करो, परंतु अडाणी लोकांत सरकारानें लोकांनीं आपल्या मुलांस विद्या शिकविण्यास भाग पाडलें पाहिजे. प्राचीन इतिहास अवलोकन केला असतां असें दिसून येईल कीं प्राचीन काळी ज्या विद्यांचें माहात्म्य होतें त्या विद्या संपादन करून घेण्याविषयीं तेव्हांच सरकार आपल्या प्रजेस भाग पाडीत असत. असें आतां कां होऊं नये. रिसोड परगण्याची जागा खरी. येथें सावकारांची वस्ती खरी. परंतु सावकार बहुतेक तीन शेंडे आहेत. यांचें व विद्येचें वाकडें असतें. ब्राह्मणाची वस्ती फारशी नाहीं. पुढारी ब्राह्मणच आहेत. ह्या गांवी पुढारी रा. रा. चिमणराव त्रिंबक पांडे हे, आहेत. यांसच आनासाहेब असें ह्मणतात. दुसऱ्या एक दोन व्यक्ती आहेत. परंतु त्या थोर असल्यामुळें थोराला योग्य अशीच कामें करितात. त्यांचे पासून गांवाला व शाळेला कांहीं उपयोग होतां दिसत नाहीं. मात्र त्यांच्यापासून फंदफितूर मात्र हमेश चाललेला असतो असो.

आतां आमच्या सुदैवानें आह्मांस उत्तम प्रकारें शिकलेले. मन मिळाऊ. शांत स्वभावाचे असें मास्तर मिळाले आहेत. हे आल्या पासून फार मेहनतीच्या योगानें आपल्या शिष्यजनांचीं मनें आपल्या कडे ओढून घेण्याचा यत्न करीत आहेत. परंतु वरच्या इयत्तेंत ह्मणजे (५-६) यांत फारच मुलें कमी ह्मणजे २ व ४ अनुक्रमें अशीं आहेत. या मुळें विचाऱ्याच्या मेहनतीचें फळ मिळेल कीं नाहीं याचा वानवाच दिसतो. ह्या इयत्ता शिकणारीं मुलें आणखी मिळविण्याची खटपट केली तेव्हां असें समजलें कीं अशीं मुलें गांवांत मुळींच नाहींत. फक्त चवथे इयत्तेपर्यंत येथें शाळा चालूं शकेल असें लोक बोलतात. सिद्धी फार दूर असल्या मुळें फक्त चितामात्र नवीन आलेल्या मास्तरांस करावी लागते आहे. ह्या शाळेंत हमेश भांडण होतच असतें. नणुकाप ह्या शाळेला तो वरच आहे. येथें अजून यादवीचे प्रकार चालू आहेत. मागील मास्तरांचे वेळीं शिक्षा झालेल्या पैकीं येथें दोन मास्तर आहेत. त्यांचें व गांवकरी लोकांचें पटत नाहीं. ते मुद्दाम मुलांना मारितात व शाळेंतून काढून टाकितात व दुसऱ्या नागप्रकारच्या शाळेला प्रतिकूळ अशा गोष्टी करितात असें लोक बोलतात. यांची येथून बदली झाल्या शिवाय शाळा सुधारेल असें वाटत नाहीं. तर मे. डायरेक्टर साहेब बहादूर या गोष्टीकडे लक्ष्य पुरवून बंदोबस्त करून आह्मा रिसोडस्थ लोकांची दीन दूर करून आमची शाळा कायम राहील असें करतील अशी आशा आहे.

येथील पोलीस व कांहीं गांवकरी लोकांचें बरें नाहीं. असें होण्याचें कारण असें लोक बोलतात कीं पोलिस लोकांवर जुलूम करितें. अशी गोष्ट असेल असें संभवत नाहीं तरी लोकांचीं मनें अशा सरकारच्या कामा विषयीं वितुष्ट होणें हें उभयतांनाही हानिकारक आहे. पोलीस लोकांच्या सुखासाठींच आहे. मग पोलिसा पासूनच जर लोकांना त्रास होत असेल तर मात्र गोष्ट फार चांगली असेल समजलें पाहिजे.

येथें पोस्ट ऑफिस आहे. परंतु डाकेंतील पत्रें वेळच्या वेळीं मिळत नाहीं अशी लोकांची कुरकुर आहे. कार्डेंही मिळत नाहींत या मुळें पाव आण्या ऐवजी लोकांना अर्धा आणा खर्चावा लागतो. लोकांच्या सोई रितां ह्या गोष्टी असतां असें कां व्हावें हें समजत नाहीं. पत्रकर्ते राव कृपा करून छापावें मागील प्रमाणें येथून कधीं कधीं आपल्या दर्शनास येत जाईन. हे विनंती.

आपला रिसोडस्थ
"स"

खामगांव शुक्रवार वैशाख शुद्ध ७
शके १८१०.

रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांसः—

वि० वि० उन्हाळ्यांत आमच्या खामगांवास हवा पाण्याच्या संबंधानें विशेष सोयी आहेत तशा वऱ्हाडांत अनेक जिल्ह्याच्या सदर स्टेशनच्या ठिकाणीं सुद्धां सांपडणार नाहींत. आमचा गांव लहान खरा पण टुमदार असून व्यापाराच्या मानानें अवघ्या वऱ्हाडांत खामगांवची सरशी होईल. हल्लीं सव्याच्या देववेवी, दर्शनी हुंड्यांची चलावन, नाना खरेदी, वगैरे अनेक व्यापार कमजास्त प्रमाणानें मोठ्या धाटावर चालले आहेत. आमच्या खामगांवचे पाऊल व्यापारांत पुढें असल्यामुळें लोक वस्तीच्या प्रमाणानें व्यापारी, उदमी, शेटसाहुकार इत्यादि मंडळी गावांतील हरएक तऱ्हेच्या प्रकरणांत प्रमुख असून सत्ता मसलत त्यांचीच चालते. राज दरबारचीं कामें मुख्यत्वेंकरून ही महाजन मंडळी चालवितात. लोकोपयोगी सार्वजानिक कामांत ही हे श्रेष्ठश्रेष्ठ श्रीमान गृहस्थ पुढें असतात. अशा पद्धतीची एक विलक्षण व्यवस्था आहे तरी नाना प्रकारचीं कामें सुयंत्र चालतात. येथील कांहीं गृहस्थ प्रस्तुत स्पेशल माजिस्ट्रेटची जागा पटकाविण्यांत फारकार उद्युक्त आहेत. त्यांचे मगीरथ यत्न सफल झाले ह्मणजे पुढें त्या संबंधानें विशेष सुचना करावयाच्या आहेत व पुष्कळ लफडीं लोकांस अहितावह होतात त्यांचे दिक्दर्शन करावयाचें आहे तें आपल्या परवानगीनें सवडी प्रमाणें करीन. तुमच्या अकोल्यास सार्वजनिक सभेचीं कामें आमच्या पेक्षां उत्तम चालावींत पण पुष्कळ कामांत तुमची चाल-

ण उठते व नाना प्रकरणांत तुमची पिच्छेहट आहे. म्युनिसिपालिटी पहा. सभा पहा. आमची सार्वजनिक कामें उठविण्याची रीती बालाणल्या सारखी आहे. आमचे आही गोष्टींत निपुण नाही कारण आत्मस्तुतीचा पाठ झाल्याच शरीर मजबूत येईल. आमचीं एखादे लोकोपयोगी काम करण्याचा संकेत. सर्व साधारण कामांत एकमत घार पंचाईत आपण ठरवून घ्या. तुमच्या मुनिसिपालिटी मध्यें गुळाचा गणपती व गुळाचा नैवेद्य यांतला पर्याय आहे. असें ह्मणतात पण खरोखर त्या ह्मणण्याची सत्यता आमच्या खामगांवासही पहाण्या सारखी आहे. लोकांनीं नियुक्त केलेल्या सार्वजनिक सभेच्या सभासदांची नामावळी पाहिली ह्मणजे वरील आमच्या ह्मणण्याचें स्पष्टीकरण होईल. आमच्या मुनसिपालिटीच्या संबंधानें कित्येक वेळां 'वऱ्हाड समाचार' पत्रांतून लेख आले आहेत त्यांत बहुतकरून मुनसिपालीटीची नादारी दाखविली आहे. ती ह्मणणें खोटी आहे. असें प्रतिपादण्याचा हेतु नाहीं. कारण मुनसिपालिटीच्या सभासदांचें वैभव लक्षांत आणा. त्यांची व्यवहार दृष्टी कोठवर लांब पोचते हें बघा त्यांतील दिलदार, खानदानी, गृहस्थांच वर्तणुकीमुळें किती लोकांवर बसेल त्याचे धोरण बांधा ह्मणजे वेळोवेळ लोकांनीं नाके मुरडावीं असें घडतें त्याबद्दल कांहीं विशेष वाटणार नाहीं आणि बऱ्या वाईट घडून येत असलेल्या गोष्टी यथान्याय आहेत असें कबूल करावें लागेल.

पत्र लिहिण्याचा मूळ उद्देश बाजूस राहिला जो लोकांपुढें मांडून ठेवितो. त्यांनीं त्याचे कृपावलोकन केलें मी आपल्याला कृतार्थ मानीन.

खामगावांतील गर्भश्रीमान, सुखवस्तु घराण्याचे शेटसावकार, व्यापारी उद्यमी पेढीवाले सभ्य गृहस्थ हो:— आपण लक्षावधि रुपयांचे व्यापार चालवितां पण आपणास अनुकूळ असून आपण सहस्त्रशः रुपये सरकारच्या तिजोरींत पोंचवून आमचें अकल्याण करीत आहां. पोस्ट खात्यानें मनीआरडरची आणि सेव्हिंग ब्यांकची शाखा जोडल्यापासून सरकारच्या खजिन्यांत हजारो पैसे त्या निमित्तानें जात आहेत आणि त्या त्या परीनें आपला देश संपत्तीशीं आचवत आहे. तिकडे क्षणभर नजर फेका. प्रथम ह्या दोन शाखा आपल्या ताब्यांत घेण्याची युक्ति लढवा. आपण मनावर घेतल्यास ह्या गोष्टी कांहीं अवघड नाहींत. सहज होण्यासारखा असून व्यापारांतल्या व्यापारांत एक दुसरा सुलभ मार्ग निघेल. आपण कन्याकुमारीपासून हिमालयापर्यंत हुंड्या चालवितां मग मनी आरडरीचें काम आपल्या जोखमीवर घेण्यास फार कठीण वाटण्यासारखें त्यांत काय आहे. हा प्रश्न आपण आपापल्या मनास विचारून पहा. सर्व श्रीमान लोकांची एक सभा भरवा एखादी पेढीवाली कंपनी काढा. कंपनीच्या प्रामाणिकपणाविषयीं लोकांची तंतोतंत खात्री करून टाका. ह्मणजे लोक आपापल्या मनी आरडरी तुमच्या पेढीमार्फत पाठवितील. सरकारच्या निरखापेक्षां तुमच्या पेढीचे दर कमी ठेवा ह्मणजे लोकांचें लक्ष सहज तुमच्या पेढीकडे वळेल. मनीआरडरीचें काम तुमच्या पेढीकडे आलें तर त्यापासून सर्वांचें कल्याण आहे. आपले हुंडीचे व्यापार वाढतील. पंचवीस रुपये दुसऱ्या मुक्कामीं धाडण्या करितां चार आणे सरकारच्या तिजोरींत भरावे लागतात. तितके न लागतां लोकांची सोय होऊन पैसा आपला आपल्या जवळ खेळतां राहील. सेव्हिंग ब्यांकमध्यें पैसा ठेवून व्याज मिळतें तितकें व्याज देऊन कोणीही पैसे वापरावयास मिळाले तर हात जोडून पाठीस लागेल. अशी गोष्ट असून पुष्कळ लोक पैसे सेव्हिंग ब्यांकमध्यें ठेवतात. याचें कारण दुसरें ठिकाणीं व्याजी अविश्वास पैसा मिळण्याची मोठी भ्रांत असते. अफरातफरीचा विशेष संभव असतो ह्मणून एक मोठी पेढी काढून लोकांचा पैसा जमेल तितकें पेढीचें मुद्दल असलें ह्मणजे पेढीची सचोटी राहील व एखादी मोठी गिरणी हल्लीं सेव्हिंग ब्यांक मध्यें असलेल्या पैशावर काढतां येईल. आणि त्यामुळें लोकांचें हित आहे. व्यापाराची एक नवी शाखा निघेल. आणि सरकारच्या खजिन्यांत भर पडते ती न पडतां आमचा पैसा आपल्या उपयोगीं पडेल. तर गृहस्थ हो. इकडे लक्ष पुरवा. आणि मी ह्मणतों तें खरें किंवा खोटें याचा निर्णय ठरवा. ही नवी युक्ति काढण्याचें श्रेय आपण घेतल्यास दुसऱ्या लोकांस ईर्षा येईल आणि त्याप्रमाणें ते आपला कित्ता वळवितील तर आपण ही संधि दवडूं नये व हा विचार दिरंगाईवर राहूं नये. ह्मणून माझी सविनय प्रार्थना आहे. कळावें लोभ असावा. हे विज्ञापना.

---

**वऱ्हाडसमाचार.**

---

तिथी वैशाख शुद्ध १० शके १८१०.

---

हिंदुस्थानांत लहान मोठीं थोडीबहुत संस्थानें आहेत तीं व कायद्याप्रमाणें नेटिव लोकांचें मुख्य वैभव होय. आम्ही फार दिलगीर आहों कीं ह्या आमच्या संस्थानांतून राज्यकारभार सुयंत्र चालत नाहीं असा सर्वत्र बोभाटा झाला आहे. हा बोभाटा सर्वैव खरा आहे किंवा खोटा आहे असें एकपक्षी प्रतीपादण्याचा आमचा बिलकुल इरादा नाहीं. त्यांत कांहीं तथ्यांश निघेल पण तेवढ्यावरून सर्व साधारण नियम काढणें नीट नव्हे हें पुष्कळ आंग्लो इंडियन पत्रकर्त्यांनीं लक्षांत ठेविलें पाहिजे. सर्व संस्थानांत मोठें संस्थान ह्मटलें ह्मणजे निजामहैद्राबाद आहे. प्रस्तुत निजाम संस्थानाविषयीं हिंदुस्थानांत आणि विलायतेंत सल्लामसलती व खलबतें चालूं आहेत. त्या संस्थानची गेल्या ५ वर्षांत पैशाची एक कोटी रुपयावर लूट झाली आहे असें सांगतात एवढ्या मोठ्या रकमेची अफरातफर होण्यास परोक्ष ह्मणा अपरोक्ष ह्मणा कोणत्या तरी प्रकारानें मि. अबदुल हक कर्नीळकर हे कारणीभूत आहेत. ह्या गृहस्थांचें चरित्र निजाम सरकारचे होम सेक्रेटरीच्या नात्यानें कांहीं विलक्षण आहे.

निजामचे राज्यांत रेलवे नवीन निघाली त्यावेळीं त्या रेलवेच्या उत्पादकांस मि. अबदुलहक यांनीं सुमारें एक लक्ष पौंड विश्वतेस पोंचते केले असें ह्मणतात. हा पैसा घेणाऱ्यापैकीं एक गृहस्थ इंडिया कौंसिलचे सभासद होते. पुढें मि. अबदुलहक यांनी रेसिडेंट मि. क्वारदरी व कर्नल मार्शल या उभयतांनीं संगनमत करून रेलवे निजाम सरकारास हस्तगत करून घेतली. मग काय मि. कर्नीळकर करतील ती पूर्व दिशा! पुढें 'येऊन मार्गानें' कंपनीचे खांडा उभारून होम सेक्रेटरींना हितशत्रू प्रमाणें आपल्या धन्यास १० लक्ष पौंडाची टोपी घालतली. ही गोष्ट रेसिडेंट व कर्नल मार्शल यांच्या तर्फे झाली आहे. नंतर धन्याच्या पश्चात् ६० लक्ष रुपये सरहद्दीच्या प्रकरणांत खर्च घालून हिंदुस्थान सरकार मार्फत निजाम सरकारास मुकाट्यानें कबूल करणें भाग पडलें. ह्या थोड्याबहुत गोष्टी उजेडांत आल्या आहेत आणखी शोधांतीं काय काय निष्पन्न होतें पहावें.

विलायतेस हल्लीं हैदराबाद प्रकरणाच्या चौकशी साठीं कमिशन बसलें आहे. हिंदुस्थानांतून निजाम सरकार मार्फत मेहदी अली इत्यादि गृहस्थ गेले आहेत. मि. अबदूल हक बारिस्टर इनव्हरॉरिटी यांस ६००० रुपये देऊन विलायतेस पाठवीत आहेत. हजारों रुपये खर्चाच्या तारेंतून बातम्या येत जात आहेत अशी एकच धुमाळी आहे. तेव्हां एकंदरीनें 'भीक नको पण कुत्रा आवर' या ह्मणीचा दाखला आह्मा पुढें येऊं पहात आहे ह्मणून हें प्रकरण सर्व नेटिव लोकांस असमाधानकारक वाटत आहे.

---

आम्हांस एक आनंदाची खबर कळते कीं राव साहेब थोंडो शामराव गरुड यांस होळकर सरकार दिवाण नेमणार आहेत. ही गोष्ट खरी असल्यास योग्य निवड झाली असें कोणी ही कबूल करील.

---

गेल्या अंकीं लिहिल्या प्रमाणें बुधवारीं बहिरमजी धर्म शाळेंत जाहिरसभा भरून राष्ट्रीय सभेस वऱ्हाडांतून सभासद पाठविण्या संबंधानें खालील गृहस्थांची अकोले तालुक्या करितां कमिटी नेमण्यांत आली आहे:—रा. रा. अनंराव हरीसिंगजी देशमुख वाशींटाकळी, देवराव देशमुख बोरगांव, गोविंदराव देशमुख उगवे, जयवंतराव देशमुख तामसी, दुलतराव देशमुख डोंगरगांव, बाबामिया कुरणखेड, बापुराव कुळकर्णी चिखलगांव, मुकुटराव देश. उगवे, काजीसा. वार्शीटाकळी, किसनसिंग बुसर, सोराबजी मंचरजी, इच्छाराम रंगिलदास, सलिमखान, मौलवी अबदुल कादर, मिरजा अब्बासबेग, नयछष्ण बगाजी. रामप्रताप, पांडुरंग बापुजी, नयराम पाटील सांगळुद, व्यंकटराव रामचंद्र, जगु पाटील, देवराव विनायक, शंकर गोविंद वकील, हरी रामचंद्र अनवीकर नंतर या पैकीं सहा गृहस्थांची व्यवस्थापक कमिटी नेमून पहिल्या सभेचें काम आटोपलें.

पुढें दुसऱ्या सभेस सुरुवात होऊन अकोला तालुक्यांतून 'वऱ्हाड सार्वजनिक' सभेस सभासद निवडण्यांत आले आहेत:-ते रा. रा. मुगुटराव देशमुख उगवे. किसनसिंग बुसर, सोराबजी मंचरजी, रामप्रताप धुनाथदास, आनंदराव हरसिंगजी देशमुख बारसीटाकळी, बापुराव बाळकृष्ण कुळकर्णी चिखलगांव, काजी शेख अफिजुद्दीन बारसीटाकळी, चिमणाजी पाटील पाठखेड, पांडुरंग बापुजी राजुंदेकर, इश्वरदास हुकुमचंद वर्फे तनसुकदास कोठारी, मौलवी अबदुल कादर, शेख अमदबक्ष बाबामिया कुरणखेड, किसनराव देशमुख येळवण, इच्छाराम रंगिलदास निजवत नारायणदास राजाराम, गणपतराव चंद्रभान देशमुख झोडेग, जयवंतराव सुंदरजी देशमुख तामसी, बळवंतराव मुगुटराव एरंडे, दवलतराव बापुजी देशमुख डोंगरगांव शेखउसमान पांडे हरसुकदास, शिवबक्षजी.

सभेची दुसरी समाप्ति झाल्यावर तिसऱ्या सभेंत सायंकाळीं निठावरील कर माफक व्हावे ह्मणून हिंदुस्थान सरकारास वऱ्हाड सार्वजनिक सभेकडून अर्ज धाडण्याचें सर्वानुमतें ठरलें आहे.

---

# The Berar Samachar

MONDAY MAY 21, 1888.

## POLITICAL EDUCATION OF BERAR.

The advent of Mr. A. O. Hume to Berar will probably be the beginning of a new stage of political education to the people of this province. This province has of late made rapid strides in matters of education and it need hardly be stated that the general prosperity of the country is daily increasing and with it there is a general rise in the average intelligence of the public at large. People are being daily made conscious of the security of life and property the undoubted results of British rule over this province; but there is a lack of political knowledge in the masses which prevents the people from representing their grievances to the proper authorities in a legitimate manner. This knowledge has to be imparted to the people so as to create in them a capacity to have a proper perception of the benefits of British rule as also to secure to themselves the redress of their grievances. This knowledge about the constitution of the present government, and the ways and means of getting their grievances redressed, has to be given to the people of this province in common with those of others; and it cannot be denied that it is the real interest of government that people should be so systematically educated in matters of politics. It has to be remembered that this want of knowledge in the people has been the result of a foreign rule and the novel theories of government which are the necessary concomitants of that rule. Our ideas about the relations between the rulers and the ruled were of quite a different type from the one now—

th एकस्ट्रा असि.

t राहून खामगांवास

ते आपल्या कामावर

---

त अली अस्याची जिल्हा

c मे पासून अथवा

id एक महिन्याची

ple

डियन रजिस्ट्रेशन ऑ-

इंग्लिश आफिस ...ed and

रिकामी पडली आहे ...

गृहस्थाचें प्रकरण ...

हलें आहे. मराठी आ...

जागा अद्याप भरली ना...

पहावें.

येथील पोस्ट मास्तर मि. ...

पेनशनचें सरटीफिकीट पाठविलें

नां आपलें काम चांगलें करून

अबुनें काढलें.

---

वर्तमानसा...

... ... ... ... १ ०८
... ... ... ... ०४
मेहिटी बद्दल.
१० ओळींचे आंत रु. १
पुढें दर ओळीस ०।०१
दुसरे खेपेस ......०१

# वऱ्हाडसमाचार.

Six monthly ... ... ...
Single copy ... ... ...

...vertisements.
Below 10 lines... ...
Per line over 10... ...
Repetition per line...

THE BERAR SAMACHAR.

VOL XXII | AKOLA MONDAY 21 MAY 1888 | NO. 20

वर्ष २२ | अकोला सोमवार तारीख २१ माहे मे सन १८८८ इ० | अंक २०

## जाहिरात.

पुणें "ज्ञानचक्षु" छापखान्यांत विक्रीस तयार असलेल्या पुस्तकांची यादी.

| मराठी आक्ट. | किंमत रु. | ह. |
|---|---|---|
| क्रिमिनल प्रोसिजर सटिक | १ | ०८ |
| सिव्हिल प्रोसिजर सटीक | १ | ०८ |
| पिनलकोड सटीक....... | ७ | ०८ |
| न्यायरत्न.......... | १ ०८ | ०२ |
| रेव्हिन्यु कोड.......... | ०८ | ०१ |
| सदरची रुळी.......... | ०८ | ०१ |
| स्टांप आक्ट.......... | ०६ | ०१ |
| कोर्ट फी आक्ट........ | ०६ | ०१ |
| कराराचा आक्ट........ | ०१२ | ०२ |
| पुराव्याचा आक्ट........ | ०८ | ०१ |
| राजिस्टर आक्ट........ | ०६ | ०१ |
| मुदतीचा आक्ट........ | ०६ | ०१ |
| आबकारी आक्ट........ | ०७ | ०१ |
| जंगलसंबंधीं आक्ट........ | ०८ | ०१ |
| विशेष न्यायाचा आक्ट.... | ०८ | ०१ |
| वतनदार आक्ट........ | ०६ | ०१ |
| लोकलबोर्ड आक्ट........ | ०६ | ०१ |
| मनोरंजक पुस्तकें. | किंमत रु. | ह |
| श्री भावार्थरामायण.... | २० | २ |
| विचित्रपुरी........ | १ | ०२ |
| मदनमंजरी ........ | २ | ०२ |
| कामकंदला नाटक.... | १ | ०२ |
| उपयुक्त चमत्कार सं. भा. १ ते १० दर भागास किं बहुही भा. घेत. ट. हा. माफ. | ०५ | ०१ |
| अलखमेपलख पलखमे दर्याव | ०४ | ०१ |
| सतारीचें १लें पुस्तक.... | १०४ | ०२ |
| संगीत राधाविलास नाटक | ०६ | ०१ |
| मदनजन्म नाटक........ | ०१२ | ०२ |
| चमत्कारचिंतामणि ... | ०१२ | ०२ |
| रामविद्याप्रकाश... ... | १ | ०२ |
| रणसंहार........ | ०४ | ०१ |
| मराठी म्हणी........ | ०७ | ०१ |
| गोपीचंद नाटक (हिं.) | ०१२ | ०२ |
| पा. हि. बुसर्म दर मा. | ०१० | ०१ |

बाळ गोविंद सापकर, ज्ञानचक्षुचे मालक.

दोन हजार रोकड ठेव आहे ती आमच्यांत तुमचे रुपये कांहीं एक देणें नसून उलट रुपये ५०० पांचशें, तुमचे दुकानचे नांवानें खात्यांत घेणें निघत आहे. आपणास कळावें. तारीख ११ माहे मे सन १८८८ इसवी.

(सही)

नथमल भगीरथ धनुका
दस्तूर खुद.

(नोटीस)

सुरजमल गिरधारीलाल, दुकान केळीवेळी तालुके अकोट खालीं सही करणार याज कडून नोटीस देण्यांत येतें कीं आमचे सो न्याचे दागिने अदमासे रुपये ३००० तीन हजारचे व तुमशी ज्वारी खंडी ४० चाळीस-प्रमाणें सवदा झाला त्या ज्वारी बदल नुकसान रुपये ३२० व रोकडी घरोड अनामत तुमच्या पाशीं ठेवलेले रुपये ५००० पांच हजार असे. एकंदर तुमचे पासून आह्मांस घेणें आहे तें सर्व नोटीस पासून आह्मांस देऊन आमच्या हातची पावती घ्यावी. असें न केल्यास रितीप्रमाणें तजवीज केली जाईल कळावें. तारीख १६ माहे सन १८८८ इ०

(सही)

झुंकीराम रामप्रताप
दस्तूर खुद

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

मुक्काम रिसोड ता. १३-५-८८.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

कृतानेक सा. नमस्कार विनंति विशेष. मागें आपल्या पत्रांत येथील शाळेसंबंधीं दोन पत्रें छापलीं आहेत त्यावरून ह्या शाळेची स्थिति कशी झाली आहे. हें आपले लक्षांत येऊन चुकलेंच आहे. दिवसानुदिवस ह्या शाळेचें पाऊल सुधारण्याकडे न जातां मागेंच पाय आहे. शाळा हें गांवचें भूषण होय परंतु असें समजणारे लोक फार थोडेच. विद्ये वाचून कोणती ही सुधारणा होत नाहीं, सुधारणे वाचून लोक स्थिति चांगली होत नाहीं, लोक स्थिति चांगली झाल्या शिवाय देशाची सुधारणा होत नाहीं. देशाची सुधारणा झाल्या वांचून. भरभराट होणें ही आशाच नाहीं. ह्या गोष्टीवरून पहातां विद्या सर्व देशांत सर्व लोकांत सर्व काळीं पूर्ण सुधारणांचें व सुखाचें आदीस्थान होय. पर्यंत ह्या गोष्टी लोकांना समजत नाहीं तो पर्यंत राज्यचालकांनीं त्या आपले प्रजेस सामोपचारानें अगर कोणत्या तरी अन्य रीतीनें समजावल्या पाहिजेत. परंतु जो पर्यंत सरकार ह्या गोष्टी करण्यापासून पराङ्मुख आहे तोपर्यंत कांहीं होणें नाहीं. सरकारचा इष्ट हेतु लोकांना विद्यामृत प्राशन करविण्याचा तो मात्र सिद्धीस पावत नाहीं. मोठमोठ्या गांवीं व शहरीं जेथें लोकांना विद्येची अभिरुची आहे व जेथें लोक आपल्या स्वताहाच्या पैशानें ही आपल्या मुलांचें शिक्षण चालवितात अशा ठिकाणीं सरकार दुर्लक्ष करील तर करो, परंतु अडाणी लोकांत सरकारानें लोकांनीं आपल्या मुलांस विद्या शिकविण्यास भाग पाडलें पाहिजे. प्राचीन इतिहास अवलोकन केला असतां असें दिसून येईल कीं प्राचीन काळीं ज्या विद्यांचें माहात्म्य होतें त्या विद्या संपादन करून घेण्याविषयीं तेव्हांच सरकार आपल्या प्रजेस भाग पाडीत असत. असें आतां कां होऊं नये. रिसोड परगण्याची जागा खरी. येथें साहुकारांची वस्ती खरी. परंतु सावकार बहुतेक तीन शेंडे आहेत. यांचें व विद्येचें वाकडें असतें. ब्राह्मणाची वस्ती फारशी नाहीं. पुढारी ब्राह्मणच आहेत. ह्या गांवी पुढारी रा. रा. चिमणराव त्रिंबक पांडे हे आहेत. यांसच आबासाहेब असें ह्मणतात. दुसऱ्या एक दोन व्यक्ती आहेत. परंतु त्या थोर असल्यामुळें थोराला योग्य अशीच कामें करितात. त्यांचे पासून गांवाला व शाळेला कांहीं उपयोग होतां दिसत नाहीं. मात्र त्यांच्यापासून फंदफितूर मात्र हमेश चाललेला असतो असो.

आतां आमच्या सुदैवानें आह्मांस उत्तम प्रकारें शिकलेले. मन मिळाऊ. शांत स्वभावाचे असे मास्तर मिळाले आहेत. हे आल्या पासून फार मेहनतीच्या योगानें आपल्या शिष्यजनांचीं मनें आपल्या कडे ओढून घेण्याचा यत्न करीत आहेत. परंतु वरच्या इयत्तेंत ह्मणजे (५-६)पांत फारच मुलें कमी ह्मणजे २ व ४ अनुक्रमें अशीं आहेत. या मुळें बिचाऱ्याच्या मेहनतीचें फळ मिळेल कीं नाहीं याचा वानवाच दिसतो. ह्या इयत्ता शिकणारीं मुलें आणखी मिळविण्याची खटपट केली तेव्हां असें समजलें कीं अशीं मुलें गांवांत मुळींच नाहींत. फक्त चवथे इयत्तेपर्यंत येथें शाळा चालूं शकेल असें लोक बोलतात. सिद्धी फार दूर असल्या मुळें फक्त चिंतामात्र नवीन आलेल्या मास्तरांस करावी लागते आहे. ह्या शाळेंत हमेश भांडण होतच असतें. नणुकाप ह्या शाळेला तो वरच आहे. येथें अजून यादवीचे प्रकार चालू आहेत. मागील मास्तरांचे वेळीं शिक्षा झालेल्या पैकीं येथें दोन मास्तर आहेत. त्यांचें व गांवकरी लोकांचें पटत नाहीं. ते मुद्दाम मुलांना मारितात व शाळेंतून काढून टाकितात व दुसऱ्या नानाप्रकारच्या शाळेला प्रतिकूल अशा गोष्टी करितात असें लोक बोलतात. यांची येथून बदली झाल्या शिवाय शाळा सुधारेल असें वाटत नाहीं. तर मे. डायरेक्टर साहेब बहादूर या गोष्टीकडे लक्ष्य पुरवून बंदोबस्त करून आह्मा रिसोडस्थ लोकांची दीव करून आमची शाळा कायम राहील असें करतील अशी आशा आहे.

येथील पोलीस व कांहीं गांवकरी लोकांचें बरें नाहीं. असें होण्याचें कारण असें लोक बोलतात कीं पोलिस लोकांवर जुलूम करितें. अशी गोष्ट असेल असें संभवत नाहीं तरी लोकांचीं मनें अशा सरकारच्या कामा विषयीं वितुष्ट होणें हें उभयतांनाही हानिकारक आहे. पोलीस लोकांच्या सुखासाठींच आहे. मग पोलिसा पासूनच जर लोकांना ताप होत असेल तर मात्र गोष्ट फार चांगली असें समजलें पाहिजे.

येथें पोस्ट ऑफिस आहे. परंतु डाकेंतील पत्रें वेळच्या वेळीं मिळत नाहीं अशी लोकांची कुरकुर आहे. कार्डेही मिळत नाहींत या मुळें पाव आण्या ऐवजी लोकांना अर्धा आणा खर्चावा लागतो. लोकांच्या सोईत, रितां ह्या गोष्टी असतां असें कां व्हावें हें समजत नाहीं. पत्रकर्ते राव कृपा करून छापावें मागील प्रमाणें येथून कधीं कधीं आपल्या दर्शनास येत जाईन. हे विनंती.

आपला रिसोडस्थ
"स"

खामगांव शुक्रवार वैशाख शुद्ध ७
शके १८१०.

रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांसः—

वि० वि० उन्हाळ्यांत आमच्या खामगांवास हवा पाण्याच्या संबंधानें विशेष सोपी आहेत तशा वऱ्हाडांत अनेक जिल्ह्याच्या सदर स्टेशनच्या ठिकाणीं सुद्धां सांपडणार नाहींत. आमचा गांव लहान खरा पण टुमदार असून व्यापाराच्या मानानें अवघ्या वऱ्हाडांत खामगांवची सरशी होईल. हल्लीं सध्याच्या देववेवी, दर्शनी हुंड्यांची चलावन, नाना खरेदी, वगैरे अनेक व्यापार कमजास्त प्रमाणानें मोठ्या धायावर चालले आहेत. आमच्या खामगांवचे पाऊल व्यापारांत पुढें असल्यामुळें लोक वस्तीच्या प्रमाणानें व्यापारी, उदमी, शेटसाहुकार इत्यादि मंडळी गावांतील हरएक तऱ्हेच्या प्रकरणांत प्रमुख असून सल्ला मसलत त्यांचीच चालते. राज दरबारचीं कामें मुख्यत्वेंकरून ही महाजन मंडळी चालवितात. लोकोपयोगी सार्वजनिक कामांत ही हे श्रेष्ठश्रेष्ठ श्रीमान गृहस्थ पुढें असतात. अशा पद्धतीची एक विलक्षण व्यवस्था आहे तरी नाना प्रकारची कामें सुयंत्र चालतात. येथील कांहीं गृहस्थ प्रस्तुत स्पेशल माजिस्ट्रेटची जागा पटकाविण्यांत फारफार उद्युक्त आहेत. त्यांचे भगीरथ यत्न सफल झाले ह्मणजे पुढें त्या संबंधानें विशेष सुचना करावयाच्या आहेत व पुष्कळ लफडीं लोकांस अहितावह होतात त्यांचें दिक्दर्शन करावयाचें आहे तें आपल्या परवानगीनें सवडी प्रमाणें करीन. तुमच्या अकोल्यास सार्वजनिक सभेचीं कामें आमच्या पेक्षां उत्तम चालावीत पण पुष्कळ कामांत पुष्कळ ...

नोटीस.

गोगाबाई जवजे रामप्रताप मारवाडी रहाणार ... अकोला ... खालीं सही ... तें की ... हस ... स ... कळा ... श ...

organization of the Congress
...ke the people elect their repre-
...s at public meetings held at
... localities. Once attained the
... very impressive and the
... adopted by the Congress
... suffer in the estimation of the
... England and will naturally
... weight with the British
... rally.

...LTORY READING.

(... from the last nu... r.)

... कोणच्याही ... latter
... ण फिर्याद वगैरे ...

body in the nature of a central committee at Amraoti for the province of Berar has been organized or is to be organized, with branches in the districts. The cardinal duty which the committees consider themselves bound to do is to give to the people of Berar an idea as to the nature of the present Government and the correlative rights between the rulers and the ruled. The people are to be impressed with the beneficence of British rule and are to be made cognizant of the methods of applying to Government for the removal of inherent defects in administration wherever they exist. The secondary idea aimed at by these committees is to make the people send delegates to the National Indian Congress as representatives from various places in the province. To attain the first object viz that of giving general political education to the masses (and this is really the most important of the two in its eventual effects) the Committee mean to distribute political pamphlets and have responsible and influential members and agents of the Committee to lecture upon political topics. The secondary object has a present and immediate utility in as much as the people are to be asked to send up deligates to the Congress to discuss political questions. In connection with this latter object it has to be mentioned that Berar was not at all represented at the three previous Congresses; and this fact was very significantly brought to notice by Mr. Hume who naturally dwelt upon the obvious necessity of all provinces in India being duly represented.

Interested people in England have persistently been attempting to make the English public believe that the National Congress was of no political consequence; that the Congress consisted of place-hunters and disaffected half educated natives who could in no sense be said to represent the public opinion in England. That the people who formed the Congress did not represent the nobility of the country or the gentry either; and that these men had really no substantial interests at stake in the country. The public opinion in England is thus being put off the scent; and if this idea once takes root with no counteracting agency to check it, it will be extremely difficult for the people of India to obtain a hearing in England. Everybody knows in India that the members of the Congress are not mere nobodies but that they are in fact the cream of educated India. The cause of all this misconception about the Congress is in a great measure due to the want of any actual system of election of the popular representatives at the Congress. The busy wire-pullers in England can lay their finger on this one thing and mislead British public opinion; and the immense distance and the scanty exchange of ideas between the peoples in India and England makes such a misrepresentation possible. The most desirable thin[illegible]emove this apparent defect in [illegible] organization of the Congress is [illegible] ke the people elect their repre[illegible] a at public meetings held at [illegible] localities. Once attained the [illegible] be very impressive and the [illegible] ns adopted by the Congress wi[illegible] suffer in the estimation of the publ[illegible] England and will naturally ca[illegible] weight with the British pu[illegible] rally.

## [illegible]LTORY READING.

[illegible] from the last nu[illegible]

[illegible] on [illegible]

[illegible]

class of books, and for the rest, on regard to all our studies and readings here and to whatever we may learn we are to remember that the object is not a particular knowledge, not that of getting higher and higher in technical perfection and all that sort of thing. There is a higher aim lying at the rear of all that, especially for those who are intended for literary or speaking pursuits, or the sacred profession. We are ever to bear in mind that there lies behind that the acquisition of what may be called wisdom — namely, sound appreciation, and just decision as to all the objects that come round us, and the habit of behaving in justice, candour, clear insight, and loyal adherence to fact. Great is wisdom, infinite is the value of wisdom. It cannot be exaggerated. It is the highest achievement of man. Blessed is he that getteth understanding?"

We have noticed at more than one point in this essay that our chief aim should be directed as much to the manner as to the matter of our reading. It is not only, perhaps, it is not so much, a question of what we read as h[illegible] we read it. Undoubtedly there are great and noble works, such as Mr. Carlyle probably had in his mind, which are qualified to produce a great effect and to lead the soul and intellect distinctly heavenwards, while there are undoubtedly some which have decidedly noxious and baneful character. But the great mass of books are like the great mass of men a mixture of good and evil, or neither to be blindly followed nor blindly rejected. It would but narrow the mind in the first place: and, to be sure, it is that from narrowing to perverting is but a short step. Here is the advice of a very wise councellor, especially to youth, the late Dr. Arnold. He says—" Keep your view of men and things extensive, and depend upon it that a mixed knowledge is not a superficial one. As far as it goes, the views that it gives are true, but he who has read deeply one class of writers alone, gets views which are almost sure to be perverted, and which are not only narrow but false. Adjust your proposed amount of reading to your time and inclination. This is perfectly free to any man, but whether the amount be large or small let it be varied in its kind and widely varied. If I have a confident opinion on any one point connected with the movement of the human mind it is on this." If, then, we agree that the most important question is not what but how we shall read, let us consider the danger against which we must be on our guard. We have already touched upon that of indolence, even though it be busy indolence. There is another fault which we must avoid—that of misdirected energy, the enery of the unhappy student whom Mr. Lawel selects as the butt of his clever satire—"A reading machine ever wound up and going, he mastered whatever was not worth the knowing." It is to men of this sort that the old proverb applies.— They cannot see the wood for the trees. They are so intent upon details that they lose the idea of the whole, and want for grasp of the whole they lose the benefit of the very details with which they are so energetically busy themselves. The remedy is not far to seek, and we may give it as a remedy applicable to both faults of which we have been speaking. It is, always to read with an object and that a worthy object. Perhaps in saying this we may lay ourselves open to the charge of opposing ourselves to the desultory reading of which rather we have been declaring ourselves a defender. But it is not really so and there should be no reason why a desultory reader should not be a reader with an object. He may be following up a train of thoughts which leads him to consult first one work and then another. He may be seeking for evidence of facts which can only be satisfactorily obtained by collecting a great number of authorities, and he may be examining many books which he only knows by name to see whe thertqey throw any light upon the subject of his researches. Not inprobably while he is reading with such a purpose as that and is looking a little below the surface of what he reads, he will, as it were, stumble [illegible] unexpected discoveries such as the pedantic student who has devoted himself to the closest reading of which a machine is capable, would never by any possibility have made. Lord Beconsfield's favourite saying, that adventures are for the adventurous, applies to the literary adventurer as much as to any other or, again, we may be reading with a view to discover the full meaning of an author who has obtained celebrity and who has exercised an important influence over the minds of men, or we may be studying mere style or power of expression, or we may be comparing an author's writing with what is known of the author's life—in short, there are endless subjects which we may be pursuing while we seem to be aimlessly turning over the leaves of one book after another, and to be wasting time on which we are in fact employing most profitably as well as most diligently. But there is yet an object with which a man may read and with regard to which it is very desirable that we should say a few words, because it connects itself with very practical questions of the day. A man may read hard in order to get up as it is called some particular subject or subjects for an examination. In short he may give himself up to be crammed and cramming has now a very different significance from that which attached to the same process before the days of competitive examinations. In old time a man crammed in order to get admiration probably the less he knew the more he desired the reputation of knowledge, in order to gain that reputation he was likely to try all manner of shortest cut to it. Have one ever read the amusing account which Teneis gives of a wealthy man of this class-Calvisius Salbinus? This worthy had a large family of slaves and freemen, and he was troubled with a short memory so short, indeed, that he would confuse Achilles with weysses and hopelessly forget Priam, still he desired to appear learned and he had the wit to discover the means, He laid out a large sum in the purchase of slaves one of whom knew Homer from beginning to end, another Hesiod equally well, and nine others who were thoroughly acquainted with as many lyric poets. When he could not buy them ready-made he bought the slaves and had them trained, and when once he had got his forces in order he took to worrying his friends and making their supper miserable by turning the conversation into channels which enabled him to show off his learning, for, as he justly argued, learning which he had bought and paid for it so high a price assuredly was his own.

( to be continued. )

## वऱ्हाड.

मि. ए इलियट आक्टि. डेपुटी कमिशनर अकोला यांस क्रिमिनल प्रोसीजर कोडचे वीस कलमान्वयें अधिकार देण्यांत आले आहेत.

मि. माणिकशा रतनजी एकस्ट्रा असि. कमिशनर यांची एलिचपुराहून खामगांवास बदली झाल्या प्रमाणें ते आपल्या कामावर रुजू झाले.

मि. मिर हशमत अली अस्याची जिल्हा वाशिम यांस तारीख २० मे पासून अथवा ते घेतील त्या तारखे पासून एक महिन्याची हक्काची रजा मिळाली आहे.

सन १८८७ चे इंडियन रजिस्ट्रेशन अॅ-

कट तिसरा कलम अन्वयें रेसिडेंट साहेबांनी रा. रा. विनायक व्यंकटेश यांस मूर्तिजापुर सबडिस्ट्रिक्टचे सब रजिस्ट्रार नेमिलें आहे.

दर्यापूर तालुक्यातील मंगरूळ येथें पंधरा रुपयाच्या ऐवजाकरितां एका गोशा च-पोचे मनुष्याचा खून झाल्याचें कळतें. संशया वरून एका परिटास पकडलें असून चौकशी चालू आहे. भारदीच्या एका खुनाची चौकशी अकोल्यात ही चालली आहे. हा खून एका मनुष्यानें आपल्या स्त्रीचें गैरवर्तन पाहून रागाच्या आवेशात केला, असें सांगतात पैसा आणि नायकी यांच्या पायात मनुष्य काय करील याचा नेम नाहीं.

केळापूरचे तहसिलदार रा० रा० सदाशिव भास्कर यांनीं दोन वर्षांची रजा घेतल्यावरून त्यांचे जागीं तेथील नायबतहसिलदार रा. रा. गोपाळ बळवंत यांस नेमल्याचें समजतें.

गेल्या बुधवारीं उमरावतीस लेडी डफरीन फंडा संबधानें सभा भरून उमरावती जिल्ह्या करितां पेटकमिट्या नेमण्यांत आल्या आहेत.

पंडित अयोध्या प्रसाद एकस्ट्रा असि. कमिशनर हे रजेवरून परत वाशिमास गेल्या आठवड्यांत रवाना झाले.

वाशिम ( १९।५।८८ )—गेल्या रविवारीं मि. नोलीस साहेब डेपुटी कमिशनर आणि मि. कुमार हरबानजी असि. कमिशनर या उभयतांस जाते वेळीं त्यांच्या सन्मानार्थ लोकांनीं बालाजीचे मंदिरांत पानसुपारी दिली. पानसुपारीचा बेतनात चांगला ठेविला होता. मि. कुमार हरबानजी यांची कारकीर्द लोकांस फार आवडली. गृहस्थ राजघराण्यांतील असून वृत्ति सौम्य व साधी आहे. यांस वाशिमची मंडळी फार चहातात. कुमार साहेबांचें आचरण निष्कलंक व मन मोठें असून साहेब स्वतां मूर्तिमान न्याय आहेत. यांच्या सारखे अधिकारी आम्हास मिळणें दुरापास्त आहे. मि. नोलीस साहेबांचा अंमल फार करडा असे. घरोघर केळींचें झाडें झालीं आणि गटारें वगैरे स्वच्छ राहूं लागलीं या दोन गोष्टी सांगण्या सारख्या साहेबांच्या हातून झाल्या आहेत.

आज रोजीं साहेबांची स्वारी येथून विलायतच्या प्रवासा करितां मेल ट्रेनानें निघाली. क्याप्टन मारिस साहेब सुज्जन दिसत असून तरुण आहेत तेव्हां ते डिपुटी कमिशनरचें काम कसें चालवितील याकडे लक्ष लागलें आहे.

इंग्लिश आफिसांत ८० रुपयाची जागा रिकामी पडली आहे तिच्या बद्दल हक्क सांगणाऱ्या गृहस्थाचें प्रकरण सध्या वादात पडलेलें आहे. मराठी आफिसांतील हे० क्लार्कची जागा अद्याप भरली नाहीं त्यावर कोण येतो पहावें.

येथील पोस्ट मास्तर मि. शेषय्या यांनीं पेनशनचें सरटीफिकीट पाठविलें. ह्या गृहस्थांनीं आपलें काम चांगलें करून दिवस मोठ्या अब्रूनें काढले.

## वर्तमानसार.

आंग्लमध्यें लष्करी कामाचे उपयोगा साठीं कुत्रीं तयार करण्याची तजवीज चाललें आहे. युरोपांतील लोक जनावरांचा उपयोग मनुष्यांचे ठिकाणीं करण्याचे सतत यत्न चालवित आहेत ते आमचे हिंदुस्थानांतील लोक मनुष्यास जनावरा प्रमाणें करण्यासाठीं यत्न करितात. तेव्हां या उभय लोकांपैकीं शहाणे लोक कोणते!

इंदोरचे दिवाणाची बदली, हैदराबाद येथील डाक्टर अघोरनाथ चट्टोपाध्याय यांस मिळतील असें जाहिर आलें आहे. हे डाक्टर अतिशय स्वतंत्र विचाराचे आहेत तेव्हां त्यांस होळकरशाईंत हांजी हांजीकरून कारभार कसा चालविता येईल हें आम्हास समजत नाहीं. डाक्टर अघोरनाथ हे निजामशाहींत मोठे नावाजलेले गृहस्थ आहेत. येथें दिवाण बहादूर आन० रघुनाथरावजप्रांनीं कारभार चालविता आला नाहीं. तेथें इतर गृहस्थ कसे चालवितील यांत शंकाच दिसते.

द्वी० बं०

—महाराज होळकर सरकारांनीं फासेट साहेबांच्या स्मरकासाठीं २०० रुपयांची देणगी दिली.

स्पाक्षोट पत्रकार कळवितात कीं, गायकवाड ता० ३०रोजीं कीनोंआ आगनबोटीमधून त्रिंदिशीकडे चालते होणार. परमेश्वरा! गायकवाडावर आज असा काय प्रसंग आणला तो प्रभु तुला ठाऊक. आमच्या मतानें त्यांना येथें राहून प्रजापालन करणें अधीक सुखावह होईल, परंतु त्यांची मनदेवता कां ठेवाळते समजत नाहीं.

आपल्या इकडील सेनापती डयूक आफ क्यानाट यांची नेमणूक जर्मनीच्या राजानें आपल्या सेनेवर केल्याची तार आली आहे. ही नेमणूक केवळ सन्मानार्थ असावी. खरोखर आमचे सेनापतीची बदली झाली असती तर आज इंग्रजी पत्रांनीं स्मारकाच्या सूचना एका मागून एक चालविल्या असत्या. असत्यांचा सत्कार होऊन स्मारक केलें तर शोभणार आहे.

म० मि०

येत्या नागपुर बक्तृत्व समारंभांत संभाषणा करितां कित्येक हिंदुधर्माभिमानी सद्गृहस्थानीं खालील विषय योजिला असून त्यांत ज्याचें भाषण उत्तम ठरेल त्यास ते आपसांत वर्गणी करून ११ रुपयांचे बक्षीस देणार आहेत.:—

विषय.

-गोवध प्रघाता पासून होत असणारें या देशाचें राष्ट्रीय नुकसान, व तो प्रघात बंद करण्यासाठीं कोणत्या उपायांची योजना करणें हितप्रद होईल. याचे वक्त्यानें आपल्या भाषणांत लोकांच्या मनावर ठसा उमटेल अशा रीतीनें विवेचन करून दाखविलें पाहिजे.

खूनः— अर्वीस एक १९ वर्षांच्या वयाचा गृहस्थ, एका मायुकाच्या नादास लागला होतो. हें त्या मायुकाच्या मातकगांस समजल्या वरून, त्यांनीं त्यास ठार मारून एका विहिरींत टकलून दिलें.!! हा खून होण्यास जिच्या नादी हा गृहस्थ लागला होता, किंवा ज्याच्या हिनें नादीं लावलें होतें; तिचें ही अंग होतें, असें कळवून, आमचा एक मित्र विचारतो कीं, विटकीलावरा स्त्रियेच्या अंगीं, प्रत्यक्ष त्या स्त्रियेविषयीं खरी सरी प्रीति असेल, असें समजणें शक्य आहे काय! या प्रश्नाचें उत्तर अनुभवा खेरीज देतां यावयाचे नाहीं, व ज्यांना तो असेल त्यांनीं आमच्या या मित्राचें समाधान करावें!

ना० स०

मि. ए. ओ. ह्यूम या युरोपिअन सद्गृहस्थाचे राष्ट्रीय सभेच्या उत्कर्षासाठीं उत्तर हिंदुस्थानांत चाललेले श्रम पाहून आनंदाश्रूं तर वाटतेच पण अगदीं परस्थांनीं आमच्या एका हितप्रद गोष्टीकरितां इतकें आणि आमच्यांतील वळकल्यांनीं त्याच बाबतींत शिथिलता धारण करावी असावी हें मनांत आलें ह्मणजे एके प्रकारें लाज ही वाटते. परवां वक्तृत्व प्रसंगी शेवटीं भाषण करितांना रा. ब. रानडे यांनीं सांगितलें कीं, राष्ट्रीय सभेच्या विरुद्ध हाका घाल करणारे सर सय्यद अहमद केवळ मुसलमानांतच आहेत असें नाहीं; तर आमच्यांतील कांहीं व्यक्तींत सुद्धां हा 'सय्यद अहमदीपणा' भरला आहे. अशा लोकांस वाटते कीं, राष्ट्रीय सभेसारख्या शुष्क चळवळीपासून कांहीं एक उपयोग होणार नाहीं. खरें आहे. आज कांहीं उपयोग नाहीं, पण उपयोग होण्याचे जे अनेक राजमान्य मार्ग आहेत त्यापैकींच हा एक आहे यांत संशय नाहीं. व या मार्गानें आपण संगनमतानें व चांगला नेट धरून गेल्याशिवाय यश प्राप्ति होणार नाहीं. याकरितां सर्वांनीं असल्या देशहितकारक गोष्टीविषयीं आपली उदासीनता टाकून देऊन तिला यथाशक्ति व यथामति साह्य करण्यास तत्पर असलें पाहिजे. रावबहादुराच्या या उपदेशाचा जननावर कांहींतरी परिणाम होवो.

पु० वे०

— मुंबईतील बहिरे व मुके यांजकरितां केलेल्या योजनेच्या साह्यार्थ ढाका येथील नबाब अहसनल्ला खानबहादुर यांणी ५०० रुपये बक्षीस दिलें असें समजतें.

— पुण्यांतील प्रसिद्ध, वयोवृद्ध व लोकप्रिय गृहस्थ रावबहादुर विजयारंगम अय्या मुदलियार यांस देवाज्ञा झाल्याचें दुःखकारक वर्तमान कळविण्यास आह्मांस फार वाईट वाटतें. सरकारास बंडाच्या समयीं बैल, गाड्या, उंट वगैरे पुरविण्यानें त्यांनीं मोठी मदत केली होती त्याजबद्दल राव बहादुर हा किताब व कांहीं नेमणूक मिळाली होती. त्यांचे वय ऐंशी वर्षांचें होतें. त्यांस तीन मुलगे व एक मुलगी आहे.

— आस्ट्रेलियांतील सर्व कालोनीजच्या सरकारांनीं चिनी मजूरदार लोकांस आपल्या जमिनीवर उतरण्याची मनाई केली असें समजतें.

– सरदार अबदुल हक हे हल्लीं हैदराबाद येथें प्रतिबंधांत आहेत व मुंबईचे बारिस्टर मि० इनवरारिटी यांस भेटण्याकरितां येण्याची त्यांस परवानगी मिळाली नाहीं. त्याजपासून पंचवीस लक्ष रु० वसूल करून घेण्याची तजवीज करण्याचा विचार चालला आहे असें ह्मणतात.

मु० प०

हल्लीं जर्मनीचे तरूण बादशहाची प्रकृति बरीच बिघडली असून या दुखण्यांतून ते पार पडतील कीं नाहीं याची शंका आहे हे खरें, तरी ते त्यास मरतील असें ही त्यांनीं सांगवत नाहीं. पण पुढच्या तयारीची पहा कशी धांदल उडाली आहे ती! लंडनच्या एका कपडेवाल्यानें अशी जाहिरात प्रसिद्ध केली आहे कीं दुर्दैवानें युवराज वारले असतां त्यांचे संबंधानें सुतकपाळणाऱ्या लोकांसाठीं लागणारे काळे रंगाचे कपडे आपले दुकानीं स्वस्त व माफक दरानें मिळतील! कां कमाल झाली कीं नाहीं!

चिनी सरकारची राजनीती— सुमारें दोन वर्षां मागें युनैटेडस्टेट्स मध्यें कांहीं चिनी मनुष्याची कतल उडाली होती, त्या बद्दल अमेरिकन सरकारानें दंड ह्मणून चिनी सरकारास २ लक्ष ४० हजार डालर दिले. चिनी सरकाराकडे फक्त दहाजण आपापल्या नातलगां बद्दल नुकसानी मागावयास आले. चिनी सरकारानें त्यांस जें रास्त तें दिलें, तथापि आज पर्यंत आणखी कोणी दावेदार आला नाहीं, ह्मणून बाकी राहिलेली मोठीशी रकम चिनी सरकारानें अमेरिकन सरकारास पाठवून दिली. या वरून अमेरिकन सरकारास चिनी सरकारच्या प्रामाणिकपणा वरून व चोखपणा वरून फार संतोष वाटला.

धा० वृ०

पुण्याच्या वक्तृत्वोत्तेजक सभेच्या समाप्तीच्या दिवशीं राव बहादुर माधवराव गोविंद रानडे यांनीं 'युनिव्हर्सिटीच्या शिक्षण क्रमांत देशी भाषा कशी चालतां येईल' या पहिले विषयावर आपलें मत प्रदर्शित केलें आहे त्यांतील मुख्य मुख्य मुद्यांचा गोषवारा 'अरुणोदया' तून खालीं दिला आहेः—

"पंचवीस वर्षां पूर्वीं युनिव्हर्सिटींतून देशी भाषा काढून, त्याच्या जागीं त्यांच्या जन्मदात्या भाषा घातल्या त्यावेळीं एका वर्तमानपत्रांत मी आपलें असें मत प्रतिपादन केलें होतें कीं, संस्कृत वगैरे देशी भाषा काढून टाकूं नका; व माझें हल्लींही तसेंच मत आहे हायस्कुलांत वगैरे जे विषय शिकविले जातात, त्यांतील बहुतेक विषय देशी भाषांत शिकविले तरी चालेल, कांहीं अडचण पडेल; परंतु ते शब्द एकदां ठरवून टाकले ह्मणजे दुसरी कांहीं एक अडचण पडणार नाहीं; परंतु वरिष्ठ शिक्षण देतांना सर्वच विषय देशी भाषांत शिकवून चालावयाचें नाहीं. एका भाषेंतील विचार ज्या सफाईनें बांधलेले असतात तसे दुसऱ्या भाषेंत ते विचार नेतांना किती पाल्हाळीक लिहावें लागतें हें स्पेन्सरनें केलेल्या Education शिक्षण विषयासंबंधानें भाषांतर करणाऱ्या मनुष्याचा अनुभव विचारला असतां समजेल. इंग्रजीचें मराठी करतांनाच ही अडचण येणार आहे असें नाहीं. तर शेक्सपियरचें कोणी इंग्रजी भाषांतर करूं लागला तर त्याला देखील हीच अडचण येणार आहे. उदाहरण Nature या शब्दाचा अर्थ बहुधा सर्वांना माहीत आहे. याचा अर्थ दुसऱ्या 'सृष्टि' शब्दानें बोधित व्हावयाचा नाहीं. जर एक गोष्ट झाली तर दुसरी व्हावयाचीच; एक गोष्ट दुसरीवर अवलंबून असावयाची असा दोन गोष्टींचा जो संबंध किंवा ज्या सांखळीनें त्या दोन गोष्टी बांधल्या गेल्या आहेत त्याला आह्मी Nature ह्मणू. आपल्या कडील उदाहरण घ्या. 'त्या मुलाची दृष्ट काढून टाक' अगोदर 'दृष्ट' या शब्दाचा अर्थ मराठी भाषा न जाणणाऱ्याना समजावून देणें फार कठीण आहे. 'Evil—eye' या शब्दानें दृष्ट शब्दाचें भाषांतर करूं. त्या मुळाचा Evil—eye (इव्हल-आय) काढून टाक असा ह्मणण्यानें त्या वक्त्याचा पूर्ण अर्थ समजावून देतां येत नाहीं; या करतां मुख्य जी अडचण आहे ती विचाराची आहे. एक विचार दुसऱ्या भाषेंत नीट रितीनें कळविणें फार कठीण आहे. देशी भाषा युनिव्हर्सिटीच्या शिक्षण क्रमामध्यें असल्या पाहिजेत. ज. यासर माहीत असणें, व ज्ञानेश्वरी-महाराज, मोरोपंत, वामन वगैरे कवी माहीत नसणें लाजरविणें आहे. याकरतां हल्लीं बी. ए. वगैरे परीक्षांत दोन किंवा पांच पुस्तकें ठेवण्याचा जो प्रघात आहे त्यांतील एकेक पुस्तक कमी करून, देशी भाषेंतील पुस्तकें ठेवावीं असें झालें असतां सहज देशी भाषांना उत्तेजन मिळेल. ही गोष्ट युनिव्हर्सिटीला कबूल नसली, तर सहा-महिन्यांनीं किंवा वर्षानें देशी भाषेंत निबंध वगैरे देऊन गुणावगुणाची एक परीक्षा नेमावी व त्याच्या योगानें देशी भाषांना थोडें बहुत उत्तेजन दिल्या सारखें होईल. हीही गोष्ट युनिव्हर्सिटीला रुचली नाहीं तर सन्मानाच्या पदव्या एम् ए., एम् डी. वगैरे देतांना एक अशी अट घालावी कीं ज्यांच्या वरील परीक्षा उतरल्या त्यांनीं परीक्षेकरतां जो विषय घेतला असेल, त्या विषयावर शोध करून स्वभाषेंत एक ग्रंथ लिहावा, व तो ग्रंथ युनिव्हर्सिटीला पसंत पडला, ह्मणजे त्यांना पदवी द्यावी. असें केलें असतां वर्षाच्या अंतीं देशी भाषेंत दहा पांच ग्रंथ होतील, व देशी भाषांना थोडें तरी उत्तेजन मिळेल. युनिव्हर्सिटीमधील इंग्रजी व संस्कृत या दोन भाषा कमी करून चालावयाचें नाहीं."

इस्टर्न हेरल्ड पत्रांत होळकर सरकारचे दिवाणांनीं राजिनामा दिला त्याबद्दल साधार मत दिलें आहे कीं "दिवाण रघुनाथराव यांणी आपल्या जाग्याचा राजिनामा देण्यांत फार मोठें वेडेपण केलें. दिवाणास जितका अधिकार देणें योग्य आहे त्यापेक्षां ज्यास्त अधिकार मिळण्याबद्दल वरील दिवाणाचें मत होतें; परंतु तसें केलें असतां राज्याचा सर्व अधिकार दिवाणाकडे जाऊन आपण स्वतः त्या दिवाणांच्या हातांतील कळसूत्री बाहुलें ठरूं असें वाटल्यावरून महाराजांनीं दिवाणास तितके अधिकार दिले नाहींत हे महाराज आणि दिवाण यांच्यांत मतभेद येण्याचें पहिलें कारण होय. दुसरें कारण ज्या सामाजिक सुधारणा करण्याचा दिवाणाचा हेतु होता त्या सुधारणा करण्या इतकें अजून इंदूर संस्थान योग्यतेस आलें नाहीं असें महाराजांचें मत होतें हें दुसरें कारण होय. दिवाणी आणि फौजदारी कामांत दिवाणास पूर्ण अधिकार होता; परंतु पै ता या संबंधानें पूर्ण अधिकार नव्हता. महाराजांनी लें काम नेहमीं वेळच्यावेळेवर करतां प्र... महाराजांची राज्य करण्याची रीती ... चांगली आहे हें इतक्या लवकर ... होणार कठीण आहे."

हें पत्र अकोला येथें ... संकरराव बाळाजी फडके यांचे "वसंत ठक्कर" छापखान्यांत नारायण ... यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर " ७ " १ ०८
किरकोळ अंकास ........................................ ०४
नोटिशी बद्दल.
१० ओळीचे आंत रु. १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस........ ०१

Per annum in arrears ... 12 ...
Six monthly ........... 8 " ...
Single copy ................... ...

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

Advertisements.
Below 10 lines.....2Rs
Per line over 10...4as
Repetition per line...3

VOL XXII AKOLA MONDAY 28 MAY 1888 NO. 21

वर्ष २२ अकोला सोमवार तारीख २८ माहे मे सन १८८८ इ० अंक २१

## जाहिरात.

पुणें "ज्ञानचक्षु" छापखान्यांत विक्रीस तयार असलेल्या पुस्तकांची यादी.

| मराठी आक्ट. | किंमत रु. | ह. |
|---|---|---|
| क्रिमिनल प्रोसिजर सटिक | ५ | ०८ |
| सिव्हिल प्रोसिजर सटीक | ५ | ०८ |
| पिनलकोड सटीक........ | ७ | ०८ |
| न्यायरत्न............ | १ ०८ | ०२ |
| रेव्हिन्यु कोड............ | ०८ | ०१ |
| सवरची रुळी............ | ०८ | ०१ |
| स्टांप आक्ट............ | ०६ | ०१ |
| कोर्ट फी आक्ट........ | ०६ | ०१ |
| कराराचा आक्ट........ | ०१३ | ०२ |
| पुराव्याचा आक्ट........ | ०८ | ०१ |
| रजिस्टर आक्ट........ | ०६ | ०१ |
| मुदतीचा आक्ट........ | ०६ | ०१ |
| आबकारी आक्ट........ | ०७ | ०१ |
| जंगलसंबंधीं आक्ट........ | ०६ | ०१ |
| विशेष न्यायाचा आक्ट........ | ०८ | ०१ |
| वतनदार आक्ट........ | ०६ | ०१ |
| लोकलबोर्ड आक्ट........ | ०६ | ०१ |
| **मनोरंजक पुस्तकें.** | **किंमत रु.** | **ह** |
| श्री भावार्थरामायण.... | २० | २ |
| चित्रपुरी............ | १ | ०२ |
| मदनमंजरी ............ | २ | ०२ |
| कामकंदला नाटक.... | १ | ०२ |
| उपयुक्त चमत्कार सं. भा. १ ते १० दर मागास किं ह.ह.ही भा.घेत.ट.हा.माफ. | ०९ | ०१ |
| अल्लाउद्दीन ... पलटन दर्यावर | ०४ | ०१ |
| ... १ ले पुस्तक.... | १०४ | ०२ |
| संगीत राधाविलास नाटक | ०६ | ०१ |
| मदनगंधा नाटक........ | ०१२ | ०२ |
| चमत्कारिक ... .... | ०१२ | ०२ |
| ... विद्याप्रकाश.. .... | १ | ०२ |
| ऋणसंज्ञा............ | ०४ | ०१ |
| मराठी ... ........ | ०७ | ०१ |
| ... नाटक । हिं. | ०१२ | ०२ |
| मा हि खुलासा दर मा. | ०१० | ०१ |

मालक गोविंद सापकर, ज्ञानचक्षुचे मालक.

### नोटीशीचें उत्तर.

तो० सौभाग्यवती अहिल्याबाई मर्द नटवाजी ...नाळ रहाणार सावरें तालुक आकोट व ... सौभाग्यवती सिताबाई मर्द मनाजी ... रहाणार बंगोरी तालुके अकोट जिल्हा अकोले या उभयतांस नोटीस देणार उद्देभान बल्लद रावजी ढेपे रहाणार राई तालुक आकोट जिल्हा अकोलें. नोटीशीनें असें कळविलें जातें कीं तुह्मी उभयतांनीं मिळून शुद्धवऱ्हाडी वर्तमान पत्रांत तारीख ३ माहे मे सन १८८८ इसवीची नोटीस दिली ती पावली. त्यांत तुह्मी उभयतां मिळून जें कांहीं ह्मणतां व कळवितां तें आह्मास कोणच्याही प्रकारानें कबूल नाहीं विनाकारण फिर्याद ... त्यास त्याजबद्दल जबाबदार आह्मी कोणत्याही प्रकारानें अगदीं नाहीं तुमचे तुह्मी काय पाहिजे तें करावें. व पाहून घ्यावें. कळावें. तारीख २१ माहे मे सन १८८८ इसवी.

(सही)
उद्देभान बल्लद रावजी ढेपे
रहाणार राई ता. आकोट दस्तूर खुद.

---

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

तारीख १९—५—८८

रा० रा० वऱ्हाड समाचारकर्ते यांस.

कृतानेक सा० न० वि. विशेष ह्या आठवड्यांत बरीच येथें सरकारी कामगारांत चळवळ सुरू झाली कारण दिवस येथें स्थिराविलेले जिल्हाधिपती मिस्तर नीळीस डेपुटी कमिशनर साहेब बहादूर यांनीं तीन महिन्याच्या रजेवर आंग्लभूमीस प्रयाण केलें. त्यांच्या सन्मानार्थ ता. १३।५।८८ इ० रोजीं श्री बाळासाहेबाच्या विस्तीर्ण बंगल्याच्या फरशीवर पानसुपारी करितां सभ्य लोकांनीं बोलाविलें होतें. सभेचा थाट वेळेस जितका चांगला ठेववला तितका ठेविला होता. ह्याच वेळीं कुमार हरनामजी अ. कमिशनर यांस पानसुपारी झाली. आमच्या वाशिमच्या लोकांनां हे कसें समजलें नाहीं कीं, निराळी मोठ्या थाटाची सभा भरवून सज्जनाला योग्य असा मान द्यावयाचा. कारण हे राजकुमार बदलून दुसऱ्या जिल्ह्यांत गेले. हे येथें असतां यांनीं आपल्या सुसंगतीच्या योगानें लोकांचीं मनें आकर्षण करून टाकिलीं होतीं. हे राजकीय घराण्यांतले असून यांचें मन फार मोठें सुजनता व कुलिनता यांच्यामध्यें अनुपमेय होय. नाहीं तर एखाद्या हलक्या कुळांतील असला व दैवयोगानें वैभवास चढला तर त्याला आकाश पाताळ एक होऊन जाऊन तो लोकांना गांजु लागतो. व जनसमुहामध्यें अप्रिय होऊन सरते शेवटीं प्राणास मुकतो. अशा प्रकारचीं उदाहरणें इतिहासांत शेंकडो आढळतील.

कुळशील चांगलें असलें तर मनुष्य चांगलें निपजतें असें ह्मणणें लोकांत प्रसिद्ध आहे तें खोटें नव्हे. त्यांचें आचरण तदनुसार असतें. कुमार साहेबांचें जनन राजकुळांत. मन मोटें. आचरण निष्कळंक. न्यायनीति मूर्तिमंत. वात्सल्य किती ह्मणून सांगू. आंग्लविद्या विभुषित अशा या सर्व गुण संपन्न सुकुलोत्पन्न कुमाराचा वियोग झाल्यामुळें विशेष वियोग जन्य दुःख होऊन लोक उदास झाले आहेत. यांची सतती संपत्ति वाढून यांची कीर्ती प्रसृत होवो अशी ईश्वरापाशीं प्रार्थना अनन्य भावानें करीत आहेत. यांचे तुलनेचा पुरुष आम्हास न्याय देणारा कधीं मिळेल तो मिळो.

मिस्तर नीळीस ह्या जिल्ह्यांत मुख्यासनीं तीन चार वर्षें विराजमान झाले होते. यांच्या कारकिर्दीत कसें ही इतर सुख लोकांना प्राप्त होवो, परंतु चमकेऱ्याची व केळींची बरोबर समृद्धि झाली. इतर कारकिर्दींत ज्यांना कदाचित कारागृहाचें सौख्य समजलें नव्हतें अशा कित्येक लोकांना त्याचा अनुभव मिळाला. यांच्या कडक अमला खालीं मोऱ्या, गटारें, रस्ते यांची सुधारणा झाली. या मुळें रोगांची पिछेहाट झाली. यांची कारकिर्द ह्या जिल्ह्यांत अजून चालावयाची असल्या मुळें इतक्यांतच लोकमतास पात्र झाली नाहीं. मात्र कित्येक लोकांना यांच्या वियोगानळानें भाजून टाकिलें आहे. व आपलें पुढें कसें होईल म्हणून बिचाऱ्यांची छाती उडूं लागली आहे. ईश्वर त्यांना चित्ताची स्थिरता देवो. व त्यांची समाधानवृत्ति राखो.

तारीख १५।५।८८ इसवी रोजीं सायंकाळीं साहेब बहादुरांची स्वारी सहा वाजतां स्पेशल टांग्यानें रजेवर गेली त्यांस पोहोंचाविण्या करितां बरीच मंडळी गेली होती. ईश्वर त्यांचा विलायतचा प्रवास त्यास सुखावह करो.

या साहेबांच्या जागीं तीन महिने काम पहाण्या करितां आलेले साहेब सज्जन दिसत असून तरुण आहेत. यांची न्याय करण्याची रीत वगैरे बद्दल अजून अनुभव आलेला नाहीं तरी त्यांच्या एकंदर लक्षणा वरून ते चांगले लोकांच्या मना प्रमाणें उतरतील असा अदमास आहे.

इंग्लिश आफिसांत ८० रुपयांची जागा खालीं झाली होती. त्या जागेवर पूर्वींचे काम करणार कोणी स्वामी होते. ते परलोकास गेल्या मुळें ती जागा रिकामी झाली त्या जागेवर नेमणुक करिते वेळीं दोन इसमांची योग्यते संबंधीं चांचणी पाहिली गेली. कोणी ह्मणतात दोघेंही लायक ठरले. परंतु कोणी ह्मणतात खालचे अधिक लायक ठरले. कोणी ह्मणतात खालच्याचें इंग्रजी ज्ञान वरच्या पेक्षां अधिक आहे. तेव्हां ती जागा त्यास मिळणें योग्य होतें. तरी खालचा वर वरचा खालीं न करितां तशीच व्यवस्था चार महिन्यांच्या मुदतींत लायकी ठरण्यावर तहकूब ठेविली आहे. आतां पहावें खालीं कोण येतो.

अजून मराठी शाखे कडील डेप्युटी क्लार्कची जागा भरण्याची लौकर राहिली आहे. ती कधीं भरणार तें समजत नाहीं. परंतु आमच्या प्रांताचे अधिपति Commissioner व जुडिशियल कमिशनर हे उभयतां आमच्या सुदैवानें गुणग्राही असून नवीन होतकरू मंडळीला उत्तेजन देणारे आहेत. तेव्हां या जागेवर कोणी तरी योग्य बी.ए. वगैरे पर्यंत शिकलेल्या मनुष्याची योजना करितील व येथील आफिसांत विद्वान् लोकांचा समुदाय भरतील अशी आह्मांस मना पासून आशा आहे. आतां अशी शंका मनांत येतील कीं हल्लीं त्या जागेवर काम करीत असलेले इसम योग्य नाहींत तर असें नाहीं. ते योग्य आहेत. काम करितात. सर्व प्रकारें त्या जाग्यास योग्य आहेत तरी सुर्ती नकी व गांवठी नकी यांत फार फरक असतो. तसेंच उत्तम शिकलेला व याच्या मध्यें फरक असला पाहिजे. योग्याला योग्यच फळ मिळालें पाहिजे.

येथील पोस्ट मास्तर मिस्तर शेषया यांनीं त्रासून होऊन पेनशनचें सर्टिफिकिट पाठविलें. ह्या जिल्ह्यांतील हवा त्यांना मुळा पासून मानवतच नव्हती. त्यांच्या हाताखालील लोकांनीं त्यास अतिशय त्रास देऊन सोडलें व वरिष्टां कडून न्यायाभाव असल्या मुळें बिचारे त्रासले व अखेरचा परिणाम सर्टिफिकिट पाठवून दिलें व एकदाचे मुक्त झाले. हाताखालील मनुष्यें दिवसानुदिवस स्वकर्म विसरत चालली. सेवक व स्वामी यांचा संबंध विसरत चालला. नीति न्याय यांची पायमल्ली झाली. याकरितां शेंकडों ठिकाणीं वरिष्ठ व हाताखालचे यांचे मध्यें द्वेषभाव व तंटे असतात यांस कांहीं उपाय नाहीं काय? पत्रकर्तेराव लोभ किजे. हे विनंती.

आपका प्रेमेच्छु
"क्ष"

---

वऱ्हाडसमाचार.

---

मिती वैशाख वद्य ३ शके १८१०.

---

सन १८८६ सालच्या वऱ्हाड म्युनिसिपाल कायद्या अन्वयें अलिशान रेसिडेंट साहेबांनीं वऱ्हाडातील म्युनिसिपालिट्यांस लागूं करण्यासाठीं नवीन सत्तेचाळीस नियमांचा मसुदा तयार करून तो तारीख १९ मेच्या रेसिडेन्सि ऑर्डरच्या जाहीरपत्रकांत सर्व लोकांच्या माहिती करितां प्रसिद्ध केला आहे. त्याचा अखेर निकाल येत्या जून महिन्याच्या दाहावे तारखेस होणार आहे ह्मणून त्या संबंधीं लोकांचे विचार काय काय आहेत हें कळविणें लांबणीवर टाकण्यास अवधि नाहीं. व दिरंगाई झाल्यास कांहीं अनिष्ट नियम असतील तर तेही पसंत ठरून लोकांचा तोटा होण्याचा संभव आहे ह्या साठीं आह्मी ह्या अंकीं त्या मसुद्याचा गोषवारा अभिप्रायासह देणार आहों.

१ वऱ्हाडांतील सात मुनसिपाल कमिट्या पैकीं आकोला, उमरावती, व इलिचपूर यांतील मुनसिपालट्यांत चोवीस चोवीस आणि वाशीम, खामगांव, आकोट व शेगांव या चार मुनसिपालिट्यांत बारा बारा सभासद असावेत. या सभासदांच्या संख्येच्या एक व दुपारीहून जास्त नाहीं इतके सभासद रेसिडेंट साहेब नेमतील.

२ लोकांनी सभासद निवडतां यावे म्हणून त्या त्या गांवचे निरनिराळे महले कींवा इलाखे ठरवून त्या त्या विभागा करितां नियुक्त होणाऱ्या सभासदांची संख्या ही नेमस्त केली आहे.

३–४ मत देणाऱ्यांच्या अंगीं कोणते गुण असले पाहिजेत. या विषयीं अशी योजना आहे कीं मुनसिपालीटीला टाऊन फंड म्हणजे पोलीस पट्टीच्या रूपानें जो एक रुपया कर देतो तो किंवा त्या शहरा मध्यें तो एखाद्या घराचा मालक असून किंवा राहिवाशी असून सरकाराला माल काळी बाबद पंचवीस रुपये देतो तो. मत देणाऱ्याचें वय एकवीस वर्षाहून कमी नसावें. पुरुषा प्रमाणेंच बायकांनाही मत देण्याचा अधिकार आहे ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्या सारखी आहे.

५ मत देणाऱ्यानें आपापल्या इलाख्यांत मत द्यावें. एखाद्यास एकाहुन अधिक विभागांत मत देण्याचा अधिकार मिळाला असल्यास कोणताही एक विभाग आपल्याकडे घेण्याची त्यास परवानगी आहे पण दिलेल्या मुदतीत तो विभाग कायम केला नाहीं तर मुनसीपालिटी ठरवील त्या भागांत त्यानें मत दिलें पाहिजे.

६ मत देण्यास लायक लोक कोण आहेत त्यांची यादी डेपुटी कमिशनर यांनीं तयार करावी.

७ अशा प्रकारानें तयार झालेल्या यादीच्या इंग्रजी मराठी आणि उर्दू प्रती करून डेपुटी कमिशनर सांगतील त्या प्रमाणें प्रसिद्ध ठिकाणीं चिकटविल्या जाव्या.

नवीन नियमा प्रमाणे मुनसिपालीटीची व्यवस्था कोणत्या तारखे पासून सुरू व्हावी हें रेसिडेंट साहेबांनीं ठरविलें म्हणजे त्या तारखेच्या पूर्वीं निदान दीड महिना तरी ह्या याद्या प्रसिद्ध झाल्या पाहिजेत. त्याच प्रमाणें पुढें सालोसाल नवीन मुनसिपाल कमिशनरांची नेमणूक होण्या पूर्वीं दीड महिना अशा याद्या प्रसिद्ध झाल्या पाहिजेत.

८–९ मत देण्यास लायक ठरविलेल्या गृहस्थांच्या यादींत एखाद्या गृहस्थाचें नांव देण्याचें राहिलें असल्यास अथवा दुसरी एखादी चूक झाली असल्यास त्या यादींत दुरुस्ती यादीच्या प्रसिद्धीच्या तारखे पासून एका आठवड्या पूर्वीं अर्ज पाठवून मुनसिपाल कमिटी मार्फत करून घेतां येईल. मुनसिपालिटीच्या निकालावर अपील डे० कमिशनरकडे करण्यास सवड ठेविली आहे पण असें अपील त्या निकाल झाल्या तारखे पासून सात दिवसांचे आंत झालें पाहिजे.

अशा प्रकारें दुरुस्त झालेली मत देणाऱ्या गृहस्थांची याद इलेक्शनच्या तारखे पूर्वीं निदान तीन आठवडे प्रसिद्ध केली जाईल.

१० मुनसिपालीटीचा सभासद होणाऱ्या उमेदवारास स्वतः मत देण्याचा अधिकार पाहिजे. शिवाय तो स्वतां करितां म्हणा अगर एखादी पेढी किंवा कोणी गृहस्थ या पैकीं कोणाच्या तरी वतीनें एजंट म्हणून म्हणा टाऊन फंडाच्या रुपानें पांच रुपये देणारा असावा. ह्या खेरीज त्या उमेदवारास लिहितां वाचतां येत असावें. स्त्री उपयोगी नाहीं, तो उमेदवार रेसिडेंन्ट साहेबांनीं मुनसिपाल कायद्यांतील १३ कलमा प्रमाणें दुर केलेला नसावा, मुनसिपालीटीचा आफिसर किंवा नोकर नसावा आणि त्याचा मुनसिपालटीच्या कामांत प्रत्यक्ष अगर परोक्ष रीतीनें नफा किंवा हिस्सा नसावा. मग तीं कामें मुनसिपालटी कडून होवोत किंवा कंत्राटानें होवोत. फक्त ही अखेरची अट कोणत्या ही स्थापित किंवा रजिस्टर्ड कंपनींत भागीदार असणाऱ्या गृहस्थास लागूं नाहीं. उमेदवारांच्या आंगीं अवश्यक लागणाऱ्या गुणां मध्यें तो स्त्री नसावा हा गुण विशेषें करून नमूद करण्याचें कांहीं एक विशेष प्रयोजन दिसत नाहीं. कारण स्त्रिया सभासद म्हणून निवडल्या जाव्या असा प्रसंग मोठ मोठ्या सुधारणेच्या शिखरास जाऊन पोंचलेल्या राष्ट्रांत आल्याचें आजपर्यंत ऐकण्यांत नाहीं. आणखी एक अट मुनसिपालीटीचीं कंत्राटें व इतर कामें या संबधानें आहे त्यांतील प्रत्यक्ष अथवा परोक्ष हे शब्द फार मोघम आहेत. त्या पासून असें ही निष्पन्न करितां येईल कीं छापखान्या सारखे कारखाने मुनसिपालीटीचीं कामें करितात तेव्हां त्या त्या कारखान्यांच्या मालकांचा प्रत्यक्ष पणें त्या कामांत फायदा असतो म्हणून त्यास सभासद निवडू नयें. अशा कारखान्यांतील एडिटर सारख्या आफिसरांचें परोक्ष रीत्या मुनसिपालीटीच्या कामांत अंग असतें म्हणून तेही सभासद होण्यास नालायक ठरतील म्हणून ही अट घालतें वेळीं त्यांत आणखी थोडा फेरफार केला पाहिजे. याहून ही एक मोठी अडचणीची अट टाऊनफंड पांच रुपये देणारा उमेदवार असावा ही होय ही करावी बाब जबर आहे म्हणून कित्येक विद्वान् गृहस्थ या नियमा मुळें सभासद होऊं शकणार नाहींत या साठीं या नियमास विद्वान् लोकांच्या संबंधानें कांहीं अपवाद म्हणून जोडले पाहिजेत.

पुढें चालेल.

॥ नरपतिहितकर्ता द्वेष्यतां याति लोके
जनपदहितकर्ता त्यज्यते पार्थिवेन ॥

कोणत्याही काळांत आणि कोणत्याही देशांत जेथें राजा आणि प्रजा हीं वेगवेगळीं आहेत तेथें राजपक्ष आणि प्रजापक्ष हे वेगवेगळे असावयाचेच. जेथें प्रजासत्ताक राज्य फार दिवसांपासून चालत आलेलें आहे आणि जेथें प्रजासत्तेची दिवसेंदिवस वृद्धी होत आहे अशा इंग्लंड देशांत आणि जेथें प्रजासत्तेचें मोठें प्राबल्य झालें आहे अशा युनायटेडस्टेटस मध्यें किंवा फ्रान्स देशांतही हाच प्रकार दिसून येतो. म्हणजे वर लिहिलेल्या शेवटच्या दोन देशांत राजा या नांवाच्या व्यक्ति मात्राचें जरी अस्तित्व नाहीं तरी ही राज्यशकट चालविण्याची सर्व सूत्रें ज्यांच्या हातांत कांहीं कालपर्यंत तरी असतात त्यांचा एक पक्ष आणि अधिकारारूढ नसलेल्या लोकांचा दुसरा पक्ष असें आपल्या नेहमी पहाण्यांत येतें. असें दोन पक्ष असले म्हणजे आपसांत दुफळी उत्पन्न होते. आणि आपआपसांतच दुफळी उत्पन्न होणें हें ज्या प्रमाणें प्रत्येक घराण्याला घातक असतें त्याच प्रमाणें प्रत्येक समाजाला आणि प्रत्येक राष्ट्रालाही तें नाशकारक होतें. रोम सारख्या सुधारलेल्या राष्ट्रांतही ज्या वेळीं दुफळी उत्पन्न झाली त्या वेळीं त्याचा नाश होण्याला फारसा वेळ लागला नाहीं. अशी स्थिती जर मोठमोठ्या सुधारलेल्या आणि शेंकडों वर्षे चालत आलेल्या राष्ट्रांची आहे तर जेथें राज्य कसें करावें हें अद्याप सर्वोपरी शिकावयाचें अशा लोक समुदायांत दुफळी उत्पन्न झाली तर त्या समुदायाची दुर्दशा होण्याला कितीसा वेळ लागणार आहे! प्रत्यक्ष स्वच्या संसाराचें ज्ञान लहान मुलांच्या भातकुलीनें जितपत होणार तितक्याच मानानें म्युनिसिपालिटीचे अधिकार आपण योग्य रीतीनें चालविल्यानें आपल्याला स्वतंत्रपणें राज्य करण्याचें ज्ञान येणार आहे. राज्यशकट चालविण्याची खरी करामत काय आहे ती म्युनिसिपालिटीचें काम आपल्या हातून योग्य रीतीनें चालल्यास साधारणपणें कांहीं अंशीं समजणार आहे. आणि ती करामत आपल्याला साधारणपणें तरी कळावी अशा हेतूनेंच आपलें सरकार आम्हाला म्युनिसिपाल कमिटीचे अधिकार देत आहे. हे अधिकार आम्ही कोणत्या रीतीनें बजावितों हें पाहून त्याप्रमाणें आमच्या योग्यतेनुरूप आमचे अधिकार कमी जास्ती होणार आहेत. या साठीं अशा वेळीं आमचे हातांत हल्लीं असलेली किंवा या पुढें येणारी सत्ता लोकांनां त्रासदायक न होईल अशा विषयीं आमच्यांतील पुढारी लोकांनी फार जपलें पाहिजे. आपले अधिकारा मुळें लोकांनां कोणत्याही प्रकारानें त्रास न होईल अशा विषयीं हल्लींच्या प्रसंगीं विशेष खबरदारी घेतली पाहिजे असें म्हणण्याचें कारण हें कीं, इतके दिवस पर्यंत ह्या म्युनिसिपालिटीच्या सभासदांची निवडणूक सरकाराकडूनच होत असे आणि त्यामुळें म्युनिसिपल कमिशनर हे आपण आपल्या वर्तनाबद्दल सरकारलाच काय तें जबाबदार आहों असें समजत असत. म्युनिसिपालिटीच्या हद्दींतील लोक आपल्या वर्तनाच्या संबंधानें काय म्हणत असतील या विषयीं आमचे म्युनिसिपल बाबा साहेब ( civic fathers ) यांना फारशी परवा करण्याचें कारण नव्हतें. आणि ही गोष्ट साहजिकच आहे. परंतु या पुढें मात्र तसा प्रकार राहिला नाहीं. आज दुसरे कडे ज्या नियमांचा मसुदा छापला आहे त्या मसुद्या प्रमाणें नियम ठरल्यास आमच्या म्युनिसिपालिटींतील आठरा सभासदांची नेमणूक लोकांकडून होणार. आणि फक्त नऊ [illegible] सभासदांची नेमणूक काय ती सरकारा कडून होणार. म्हणजे एक प्रजा पक्षाचे आणि एक राज पक्षाचे असे लोक निवडले जाणार. असें झालें म्हणजे लोक समाजाचा भरंवसा नेहमी आपण निवडून दिलेल्या लोकांवर ज्यास्ती राहील आणि त्यानीं आपसांत एकोप्याचें वर्तन ठेवून विश्वास लोकमताप्रमाणें सर्व काम घडवून आणण्यास कधींच प्रयास पडणार नाहींत. मात्र इतकी गोष्ट नेहमी लक्षांत ठेविली पाहिजे कीं लोकमताला जितका देववेल तितका मान देऊन सर्व कामें केलीं पाहिजेत. इतक्या दिवस एखाद्या बाबा साहेबांचें वर्तन लोकांनां अप्रिय झाल्यास चालत असे परंतु या पुढें मात्र तसा प्रकार नाहीं. आतां ही गोष्ट खरी आहे कीं लोक समाजाचे मता प्रमाणें सर्वथैव चालूं म्हटलें तर तसें ही उपयोगाचें नाहीं कारण कीं आपलें खरें हिताहित कोणतें आहे हे लोक समाजांतील प्रत्येक व्यक्तीस कळत नसतें तथापि ज्या प्रमाणें मुलें मोठीं झालीं म्हणजे त्यांचें मताला अनुसरून जर बापानें त्यांचे कला प्रमाणें वर्तन केलें नाहींतर तीं बापा विरुद्ध बंड करूं लागतात त्या प्रमाणेंच म्युनिसिपाल कमिशनर यांणीं लोक मताला न मानितां केवळ आपल्या इच्छेनुरूप वर्तन केल्यास गांवकरी लोक बंडाळ होण्याचा संभव आहे. बंडखोर लोक प्रत्यक्ष आमनासामना करण्यास येत नाहींत त्यांचा नेहमी "गुपीत चाळा" असतो. अशा प्रकारची बंडखोर मंडळी प्रत्येक शहरांत असावयाचीच. आणि निनावी अर्ज इत्यादि त्यांचे अस्तित्वाचें आणि त्यांचे "गुपीत चाल्या" चे सूचक आहेत. लोकमता प्रमाणेंच वागण्याचा निश्चय केल्यास तोही सडांस नेणें कठीण आहे. कारण कीं प्रत्येक बाबतींत लोक मताचे ऐक्य होणें हें कठीण आहे. किती ही जपून वागलों, लोक सेवा करण्या करितां आपण किती ही श्रम केलें, किती ही पैसा खर्चला आणि आपला अमोलिक काळ किती ही मोडिला तरी लोक आपल्याला चांगलेंच म्हणतील असें नाहीं. किंबहुना असें ही म्हटलें तरी चालेल कीं लोकांत अप्रिय होण्याला म्युनिसिपालिटीचा सभासद होणें आणि निःसीमपणें लोक सेवा करण्याला प्रारंभ करणें या सारखें दुसरें साधनच नाहीं. या म्हणण्याच्या स्पष्टीकरणार्थ प्रत्येक शहरांत उदाहरणें सांपडतील परंतु तेवढ्या वरून लोक मताला झुगारून देऊन चालावयाचें नाहीं. सर्व शक्तिमान काय तो लोक समाजच आहे आणि उत्तरोत्तर त्या शक्तीसच मान दिला पाहिजे.

## मि. सांडर्स साहेब यांचा मृत्यु.

आम्हांस लिहिण्यास पराकाष्ठेचें दुःख वाटतें कीं मे. एल्. एम्. सांडर्स कमि० साहेब यांस मंगळवार ता० २२।५।८८ इ० रोजी चिखलदरा मुक्कामीं आकस्मिक मृत्यूनें गांठलें. यांचा जन्म ता० [illegible] मे. १८१७ साली झाला आणि यांचें वय ७१ वर्षांचें होतें. हे बांध्यानें चांगले पिप्पाड पुरुष असून शरीरानें हि सदृढ होते. आणि जरी त्यांच्या वयाला ७१ वर्षे पुरीं झालीं होती तथापि यांच्याकडे पाहिलें म्हणजे यांच्या चेहऱ्यावर वार्धक्याचीं चिन्हें कांहीं एक दिसत नसत. साहेब बहादूर चिखलदऱ्यास असतां घोड्यावर बसून हवा खाण्या करितां बाहेर ख्वाले होते. कर्नल आणि मिसेस बुलक त्याच प्रमाणें साहेब बहादूरांची द्वितीय कन्या मिसेसलमर हीं त्रिवर्ग आपापल्या घोड्यावर बसून त्यांचे बरोबरच होतीं. मि. सांडर्स साहेब हे वाळर या जातीच्या जीन घेतलेल्या घोड्यावर बसले होते. पण घोडा एकाएकीं बेफाम होऊन पळत सुटला आणि त्यानें साहेब बहादुरांन खालीं झुगारून दिलें. सा-

हेब बहादूर शरीरानें इतके सदृढ असतां त्यां चें प्राणोत्क्रमण वोल्चविरूनपडल्या बरोबर झालें या वरून त्यांना कोठें तरी मर्मी लाग- लें असावें.

मि. सांडर्स साहेब यांनीं ह्या प्रांताच्या रेव्हेन्यु कमिशनराचें काम तीन वर्षांहून कां हींसें जास्त केलें. वऱ्हाडांतील पाटील पट- वा यांचा कायदा, तालुके निहाय म्युनसिपा- लटीचा कायदा डिस्ट्रिक्ट म्युनसिपालीट्यां- चा कायदा हे कायदे त्यांच्याच कारकिर्दीत पास झाले. आणि पुष्कळ वर्षांपासून भिजत- पडलेल्या रेव्हेन्यू कोडचा मसुदा सर्व तयार होऊन एक दोन दिवसांत सर्व डेपुटी कमि- शनर साहेबा समक्ष वाचला जावयाचा होता परंतु कालगति विचित्र आहे. तेथें कोणाचा इलाज नाहीं.

The Berar Samachar

MONDAY MAY
28, 1888.

## A SCHEME FOR A NEW MEDICAL SCHOOL.

In the Bombay native papers discussion is being carried on about the necessity, propriety and utility of establishing a native medical College or school in some central like Poona or Bombay. The chief object in establishing such a school is to teach the much-neglected and despised native system of medicine along with the much-advanced medical science of the West. The two systems differ from each other in many particulars as the evolution of both is the result of different modifying circumstances. But both systems treating of the same topic have necessarily a common ground. The Hindu system of medicine dates from a very remote period and these are many valuable works treating the subject which go to show that the science was very much advanced at one period of Indian history. The tide of Mohamedan invasion naturally retarding the progress of Science and Art, checked also any improvement in the Science of medicine. Since the advent of the British rule, the European system of medicine has been imported into India and the native system has been naturally shelved back. Scientific knowledge and scientific research must naturally suffer a good deal if there is no appreciative public to encourage that knowledge or to help on the research. They also suffer if there are no worthy professors of that knowledge to bring out its excellence. This has been the case in India. The advocates of the native system of medicine urge its claims as being on a par with the European system of medicine. They say that the native system has suffered greatly from indifference and ought to be encouraged —the best way for so doing being to establish a school where both the systems could be simultaneously taught Those who have learned the Western System of medicine at the Grand Medical College or who have received their medical education in European universities are mostly of opinion that native system of medicine is worth nothing. Some of them indeed go even so far as to assert that the native medicine has unscientific character. It is a collection of empirical formulas which produced good results betimes but it could not lay claim to be a systematized generalization on which all sound practice must depend. On the other hand certain others who have been taught native medical science alone raise the native system to the skies; and while belauding their own system deprecate the European medical science as being of little value at any rate in India. The truth as often happens in such extreme divergence of views lies between the two ends. Without assigning any interested motives to gentlemen of either of these views, it may safely be said that both parties know little about the system they cry down. Having been taught only one system it is but natural that they should be blind as to the excellence of any other; and there is no warrant for the opinions of either party.

Those that may have had the advantage of studying both the systems can alone be proper Judges about the relative merits and demerits of either. Even amongst such men there is a difference of opinion. Medical science is progressive and admittedly the present fund of knowledge regarding that science is greater than what it was 50 years ago in the European world. With the Hindu system there has admittedly been no improvement for hundreds of years; and as we cannot claim perfection for the knowledge of any one time we can never assert that the Hindu system was all perfect when it stood at a stand still. The Hindu system might have been the best of its time; it may have been taken up by people from Greece, Arabia and Persia; but for all that we can never maintain that notwithstanding any subsequent researches and developments in our Science, it is *still* the best system of medicine in the world or that it can hold its own against the ever progressing medical science of the West. Many native doctors are found ready to yield the palm to the European system in surgery and midwifery but otherwise they maintain, that their system is superior.

Those who have studied both the systems cannot, we think, deny a scientific character to the native method; but they object to a school where both the systems could be simultaneously taught. Gentlemen like Dr. Bhatavadekar maintain that for a due appreciation of and further development of our medical system it is necessary that it should be taught along with the European system as it would be effective in dispelling many misconceptions about the real nature of the two systems and the students would be able to utilize the best portions of each. Now even gentlemen like Dr. Bhatavadekar admit generally the superiority of European to native system of medicine; many parts of the European medical knowledge have received the special attention of distinguished specialists and have thus attained a far greater perfection. Chemistry as a Science is not found distinctly treated in works on native medicine and the same may be said of many other Sciences which are auxiliary to the knowledge and treatment of diseases. If it be true that the European system is generally better, we do not see the exact necessity of teaching both the systems simultaneously. There may be an antiquarian interest attached to the study of native medicine; but its Scientific value being less it may as well be omitted from the programme of a medical school. As to some of the Indian medicines, it is undoubtedly a fact that there are several specifics known to native doctors; and we may admit even this much that native medicines generally are found to suit the temperaments of the natives of this country better than English medicines. In short, that the *Materia Medica* of the native doctors might be utilized with advantage. This is probably the only branch which the European system might stand in need of, especially as native medicines would be cheaper than English ones, and thus it would be a great boon to the public at large. This knowledge of Indian drugs and Indian medicines generally, might, however, be gained without teaching the entire system of native medicine.

As at present imparted, the knowledge of the European system of medicine, is very difficult to be obtained. Instruction has to be given in a foreign language and the energy of students is greatly taxed in learning the language before the actual science can be learnt. This is indeed, a great drawback and a school where instruction could be imparted in the medical Science in the vernacular languages would prove a real blessing to the people. But after all, we are all laymen and are necessarily put in mind of the proposition. 'Where doctors disagree, who shall decide?'

## DEUSLTORY READING.

( continued from the last number. )

Such was cramming in the days of the Roman empire. In our own day it is not quite the same in form, though, perhaps, there may be more resemblance in substance between the crammer and the crib on the one side and the learned freedmen on the other than we should first be inclined to admit. But it would be unjust to deny that, given the necessity of preparing for an examination upon the results of which the whole career of a young man probably depends—it is natural, we may almost say, inevitable, that special preparation should be made, and that preparation should take the form of a rapid storage of the memory with as much silent pieces of knowledge, as possible, due regard being had, not to the education of the mind of the student but his being prepared to gain the largest number of marks in the shortest time. We do not now enter into the great question of competetive examinations. It is one on both sides of which there is a great deal to be said, and we are far too sensible of the advantage of the system to use hasty words of a deprecatory character. But this we wish to impress that, regarding the matter from an educational point of view, we cannot but say that learning is not to be successfully wooed by so rough so unskilful a process, and that it is only to those who approach her in a reverent and loving spirit and by the regular paths of patient and careful study that she will open the portals of her abode and admit the student to her heart. It is with her votaries as with those of the leaf in Chancer's beautiful poem:—

"Knights ever should be persevering
"To seek honour without faintive or slouth
"Fro well to better in all manner thing
"In sign of which, with leaves aye lasting,
„They be rewarded after their degree,
"Whose lusty green may not apprised be."

But, though, learning is not to be won by shortest cuts and royal roads, yet, as the philosopher's stone could turn whatever it touched into gold, so a true lover of literature can, by the alchemy of a sympathetic mind, find the true gold of the intellect in the works to which he applies himself. Here is, for example, that well-known epistle in which Horace draws both the le sons of Homer's great poems in which, as he says, the secrets of human life, and traces the springs of human action more fully and more excellently than either Chrysippus or Crator. Again, take Words worth's beautiful lines on the divinities which the lively Grecian could find in his land of hills, rivers, and fertile fields and sounding shores. These are but samples of the thousand ways in which the true poetic fancy will detect beauties or lessons which to a less observant eye would be invisible. On leaving the realm of fancy how many unexpected lights upon questions of history and philosophy will reveal to the practised and attentive reader truths and evidences which are all the more striking because they are unconsciously disclosed. Take, for instance, that curious little article—shall we call it? of Lucian's upon the Pseudomantis, the Charlatan Alexander, whose tricks and devices he exposed, and whose success in imposing upon the incredulous he details, observe how, quite casually he remarks that his hero was able to deceive all classes of philosophers except only two sects the Epicureans and the Christians. He merely mentions the fact so far as concerns the Christians; but how suggestive a fact it is. The Epicurean wh disputed the intervention of the Gods in human affairs altogether, might naturally be supposed to be incredulous and proof against superstitions pretensions. But with the Christian it might have been thought that the very reverse was likely to be the case; and, in truth, his rejection of the wonders of the deceiver could be due; not to scepticism as to spiritual manifestations: but more probably to his belief that these things were of the works of the Evil one, and were to be put away as abominable. But why should we linger with illustrations of what every reader must soon discover for himself—that the wisdom, the graces, the soul and spirit of a book are as nothing until to that book should be applied a mind and an intelligence capable of drawing forth those charms which, to inferior or less sympathetic spirits, are revealed, if at all, in an inferior degree. Perhaps there is nothing more noticeable than the treatment which a work of humour, or, it may be, of fancy, receives at the hands of these who are themselves destitute of those qualities.

( to be continued. )

## वऱ्हाड.

रा॰ रा॰ वासुदेव सदाशिव पिसोळकर क्लार्क आफ कोर्ट हे रजेवरून परत आपल्या कामीं रुजुं झाले.

मि. लावर्ट स्पेशल असि. कामिशनर यां- स तुर्त इलिचपुर येथील डेपुटी कमिशनर ने- मल्या मुळें त्यांचें स्पेशल असि. कमिशनरचे जाग्यावर मि. निझामुद्दीन यांची नेमणूक झा- ली व त्यांनीं गेल्या आठवड्यांत आपले का- माचा चार्ज घेतला.

सय्यद शमसुद्दीन अलिखान बहादुर अ- सि. कानटानमेंट माजिस्ट्रेट शिकंदराबाद यां- ची वऱ्हाडांत नेमणूक होणार असें ऐकिवांत आहे.

शिकंदराबाद येथील रिकाम्या होणाऱ्या असि. कानटानमेंट माजिस्ट्रेट च्या जागीं येथील स्माल काज कोर्टाचे जज्ज मौलवी निजामुद्दीन यांची नेमणूक होणार असें सम- जतें. मौलवी निजामुद्दीन साहेबा सारख्या न्यायी आणि मेहनती गृहस्थांची ह्या प्रांतांत आधींच कमतरता आहे तशांतून ही त्यांची बदली होणें हें वऱ्हाडांत पुन्हा मोगलाई येण्याचें सूचक आहे कीं काय नकळे.

## वर्तमानसार.

दिग्विजयी सरलिफेल ग्रिफीन एकदांचे निजधामास ( विलायतेस ) गेले. ते कदाचित् परत आलेच तर येत्या नवंबरांत येतील, पण परत येण्याची वानवाच आहे. स्वारीनें इकडे कसा काय प्रताप गाजविला तो बहुतक वाचकांना विदीत आहेच. फार तर काय! जातां जाताना देखील सर लिपेन ग्रिफीन साहेबांचे आणि होळकर महाराजांचे दोन हात झाले. साहेब बहादुरांचे मनांतून महाराजांकडून एक सुरेखसें सरटीफिकिट उपटावयाचें होतें म्हणतात, परंतु महाराजांनीं वाटाण्याच्या अक्षता लावल्यानें साहेब खट्टु झाले. महाराजांनीं नुस्त्या वाटाण्याच्या अक्षताच लाविल्या असें नाहीं, उलट थोडें चापलेंही. महाराजांचें म्हणणें कीं, आपणा बद्दल जें कांनीं आलें तें भरकटून दिलें हें कांहीं चांगलें केलें नाहीं. आपल्याला थैली लिहून दोन्ही बाजूचा विचार करावयाचा होता, आणि मग इंडिया सरकाराला रिपोर्ट करावया होता. तसें न करितां वाटेल तें लिहून इंडिया सरकारच्या मनांत विष पेरलें हें अश्लाघ्य होय. ध. वृ.

कागदाचीं पांवुरणें—न्यूजर्से येथील एका कारखान्यांत कागदाचीं पांवुरणें करूं लागले आहेत. कागदावर कागद चिकटवून मध्यें त्यांत सुतळ्या घातलेल्या असतात. हीं पांवुरणें चांगलीं बळकट होतात. पु. वै.

आमच्या सरकारास आणखी आज मितीस १०,८०,००,००० रुपये कर्ज पाहिजे. ज्यांची देण्याची इच्छा असेल त्यांनीं टेंडरें पाठवावीं, ह्मणून मागणीची जाहिरात प्रसिद्ध झाली आहे. मूळ हिंदुस्थान सरकारचें कर्ज सन १८६९ सालीं ९६ कोटी रु० होतें, त्याची फेड न होतां १८७५ त हीं कर्जाची रकम १ अब्ज १८ कोटीपर्यंत वाढली, आणि १८८० सालांत आणखी या कर्जाच्या रकमेंत ३६ कोटीची भर पडून १८८४ सालीं १ अब्ज ६१ कोटी पर्यंत मजल जाऊन पोंचली. या शिवाय या अलीकडील ३—४ सालांतील घोटाळा निराळाच आहे. म. मि.

शिकंदराबादेस हिंदुमंडळीनें देवीपुढें एक रेडा बळी दिला, त्या संबंधानें लिहितांना डेक्कन टाईम्सकर्ते म्हणतात कीं, अशा निर्दय लोकांशीं संबंध असणाऱ्यांनीं न्याशनल कांग्रेस सारख्या उलाढालींत पडणें केवळ हास्यास्पद आहे. आतां मात्र कुत्सित स्वभावाची व वृथाभिमानाची शिकस्त झाली.

मद्रासच्या मुसलमानांची सभा भरली होती. त्यांनीं सर्वानुमतें गेल्या कांग्रेसमध्यें पास झालेल्या ठरावास आपली संमती दिली. सर सय्यदाची मात्रा कां लागूं पडली नाहीं हें कळत नाहीं.

इराणच्या शहाचा एक पुत्र स्पाहन देशाचा राजा होता, त्यास रशियन सरकारानें राज्यभ्रष्ट केलें. कारण, या राजानें इंग्रजसरकारानीं दिलेल्या जी. सी. एस. आय. हा किताब धारण केला होता. इतका ही इंग्रजांवर कटाक्ष असतांही सरहद्दीच्या सीमा ठरवून आमचे सरकार स्वस्थ कसें बसतें! क. त.

पुण्यास राव बहादूर महादेव गोविंद रानडे वक्तृत्वोत्तेजक सभेच्या अखेरच्या दिवशीं 'नीति शिक्षणा' संबंधानें बोलले तें येणें प्रमाणें:—

दुसरा विषय नीति शिक्षणाचा होता. या विषयावर भाषण करणारे उमेदवारांपैकीं टिळक व पाटणकर यांनीं या विषयावर विचार करून व माहिती मिळवून आपला विषय प्रतिपादन केला. त्याचप्रमाणें वैद्यकीचा धंदा करणारे कल्याणचे एका गृहस्थांनीं येथें येऊन या विषयावर आपले विचार कळविले तेव्हां, या विषयाच्या संबंधानें मला कांहीं विशेष सांगावयाचें नाहीं, परंतु इतकें येथें सांगितलें पाहिजे कीं, ज्या उमेदवारांचीं भाषणें पसंत होऊन बक्षिसें मिळालीं, त्यांनीं सांगितलेली एक बाजू होती. दुसऱ्या बाजूचा विचार त्यांत झाला नाहीं. हल्लींच्या काळांतले युरोपांतील स्पेन्सरसारखे जे प्रसिद्ध तत्ववेत्ते आहेत त्यांच्या विचारांचें प्रतिबिंब इंग्रजी शिक्षण मिळालेल्या लोकांच्या मनावर उठल्यामुळें, युरोपियन तत्ववेत्यांच्या दृष्टीनें नीतिविषयाचा केलेला विचार तुमच्या आमच्यासारख्या इंग्रजी जाणणारांना समजेल, परंतु लाखों लोकांना त्या विषयाचा बोध होण्यास, 'ज्या वर्तनाच्या योगानें प्रत्यक्ष किंवा परोक्ष रीतीनें एकंदर जनसमुहाचें हित होतें तें सद्वर्तन,' ही स्पेन्सरची व्याख्या सांगून काम भागणार नाहीं. तात्विकदृष्ट्या विचार करून ठरलेले जे सिद्धांत कीं, नीति आणि धर्म हीं परस्पर विरुद्ध आहेत, ते किती जरी खरे असले तथापि, ते लोक समुहास पसंत पडतील अशा भाषेनें सांगितले पाहिजेत. धर्म आणि नीति अगदीं भिन्न आहेत, परस्परांचा बहिणभावंडासारखा फार झालें तर संबंध असला तरी दोन व्यक्ति स्वतंत्र आहेत. हें मत जुन्या तऱ्हेनें शिक्षण मिळालेल्या मनुष्यांस जर सांगितलें तर तें त्यांस समजण्यास कठीण पडेल. ज्या वर्तनानें एकंदर जनसमुहाचें हित होतें तो सदाचार, ही व्याख्या ऐकून तो घुटमळेल व आपल्याला तुह्मी हे काय बोलतां तें समजत नाहीं असें ह्मणेल. ज्या रीतीनें आजपर्यंत आपल्या देशांत या विषयाचा विचार झाला आहे व इतर धर्मांतून ज्या व्यवस्था चालू आहेत त्यांचें मनन करून विचार करण्याची दुसरी बाजू कितपत युक्त किंवा अयुक्त आहे हे ठरविण्याविषयीं आपण आपली प्रवृत्ति ठेवावी. हजारो लाखो वर्षांपासून कोट्यावधी लोकांनीं निरनिराळ्या धर्ममतांप्रमाणें ज्या विश्वासांचें व समजुतीचें ग्रहण केलें आहे त्या कितपत खऱ्या आहेत, त्यांत सारभूत भाग किती आहे, व अशा लोकांत त्यांच्या भाषेनें विषय कसा समजून देतां येईल हें पाहिलें पाहिजे. ज्या नवीन गोष्टीची, मताची किंवा विचाराची छाया युरोपांतून इकडे पडेल तेवढ्यावरच निर्वाह करून चालण्याची आपली संवय बरी नाहीं. यावरून स्पेन्सर आदिकरून तत्ववेत्यांचें मत चुकीचें आहे असें मी ह्मणतो असें कोणी ही समजूं नये, परंतु त्यांच्या मतास मान देतांना इतर मतांना तुच्छ मानण्यासारखा जो ठासून बोलण्याचा प्रकार होतो तितके ठासून बोलण्यास धजावें कीं नाहीं याचा विचार केला पाहिजे. मुसलमान लोकांची जर आपण स्थिति पाहिली तर, ज्या शाळांतून नुसते बुद्धिशिक्षण मिळतें तशा शाळांत ते लोक आपलीं मुलें पाठवीत नाहींत. कुराणांतील कित्येक प्रकरणें प्रत्येक मुलीस व मुलास अवगत असणें ही गोष्ट ते अवश्य मानितात व अंशतः याच कारणांनीं इंग्रज सरकारांनीं स्थापन केलेल्या विद्यालयाचा फायदा या लोकांनीं करून घ्यावा तसा घेतला नाहीं. धर्माचें शिक्षण शाळांतूनें दिलें पाहिजे असा त्यांनीं आग्रह धरून शेवटीं सरकारापर्यंत आपली दाद पोंचविली व आपापल्या शाळेंतून धर्मशिक्षणाची योजना केली. क्रिस्ती लोकांची जर स्थिति पाहिली तर काय प्रकार आढळतो तो पहाः शाळांतून धर्म संबंधीं शिक्षणा करितां तास अर्धा तास खर्च होतो व मुलांना त्याची इच्छा असो वा नसो, त्यांस तें शिक्षण घ्यावें लागतें. जगांतील तिसरा जो मोठा बौद्धधर्म तो आचरणाऱ्या लोकांची काय स्थिति आहे याचा शोध करून जर आपण ब्रह्मदेशाकडे पाहूं लागलों तर, आपणांस असें ज्या ठिकाणीं धर्मसंबंधीं शिक्षण मिळतें त्याच ठिकाणीं बुद्धिशिक्षणाची व व्यवहारिक शिक्षणाची सोय केलेली असते. मठांतून असणाऱ्या विद्यार्थ्यांस अक्षरें, अंक, शिकविलें ह्मणजे त्यांस सरकाराकडून मदत मिळते अशी तिकडची व्यवस्था आहे. आपली पूर्वपरंपरा पाहिली तर तीही इतर धर्मांप्रमाणेंच होती. गुरुगृहीं त्रास करून गुर्वाज्ञे प्रमाणें वागावयाचें व गुरूची सेवा करावयाची, हा मुख्य भाग; व फुरसतीच्या वेळीं घटका दोन घटका जो काय पाठ मिळेल तेवढा घ्यावयाचा; अशी स्थिति होती. ख्रिस्ती लोक आपल्या धर्मांत दहा आज्ञा आहेत असें ह्मणतात; परंतु आमच्या धर्मांत किती तरी आज्ञा आहेत! आमच्या सांख्यांत ज्या आज्ञा आहेत त्यांचीं मुळतत्वें किंवा इतर धर्मांतीलही ज्या आज्ञा आहेत त्यांचीं मूलतत्वें नीतीव धर्म यांचे संमेलनानें सदाचारप्रसार व्हावा अशीं आहेत. तर,त्या प्रवृत्तीप्रमाणें वागण्याचा मार्ग काढिला पाहिजे. आमच्याच लोकांनीं तेवढे या कामीं उदासीन रहावें ही गोष्ट दुःखाची आहे. तात्विक दृष्ट्या नीतीच्या कल्पना किती जरी खऱ्या असल्या तथापि, त्या धर्मरूपी कोंदणांत बसविल्यानें त्यांचा कोंवळ्या मनाच्या विद्यार्थ्यांवर जो परिणाम होणार आहे तसा परिणाम तत्वें सांगून होईल असें नाहीं. आईबापांनीं आपल्या मुलांच्या धर्म व नीतिशिक्षणा विषयीं काळजी घ्यावी व त्यांस ती घेण्यास सवड व फुरसत आहे किंवा नाहीं, या प्रश्नाचा विचार स्वतंत्र रीतीनें करतां येईल. परंतु गुरुमुखांतून धर्म व नीतीशिक्षण मिळण्याची जी परंपरा चालत आली आहे ती यापुढें कोणच्याही रीतीनें चालवतां येणार नाहीं असें म्हणणें म्हणजे दुर्भाग्य होय! या शहरीं थोड्या दिवसांपूर्वीं नूतन मराठी विद्यालयांत बक्षीस समारंभ झाला त्यावेळीं या विषयावर मी अशाच प्रकारचें प्रतिपादन केलें होतें. धर्मसंबंधीं शिक्षण कसें द्यावयाचें! मुलांना शाळेमध्यें स्नान घालून संध्यातर्पण वगैरे विधी करावयास लावावयाचें कीं काय? अशा रीतीनें थट्टा करण्यासारखा हा विषय नाहीं. गुरूच्या आश्रमांत वास करण्याची व तेथें शिक्षण मिळविण्याची पूर्वींची स्थिति आज पालटली आहे हें कोणीही कबूल करील; परंतु हल्लीं प्राप्त झालेल्या नवीन स्थितीस अनुरूप असें धर्म व नीतीशिक्षण देतां येणारच नाहीं, व एतदर्थ प्रयत्न करणें ह्मणजे वेडेपण आहे, अशी जी समजूत आहे ती सयुक्तिक विचारापासून फार दूर आहे असें ह्मणावें लागतें. भगवद्गीतेसारख्या ग्रंथांतून किंवा आणखी अशाच दुसऱ्या प्रकारच्या ग्रंथांतून मुलांना बोध करतां येणार नाहीं असें नाहीं. ज्याप्रमाणें संस्कृता करितां किंवा इतर भाषांकरितां निरनिराळे शिक्षक ठेवून व्यवस्था करण्यांत येते, तशी व्यवस्था यांत कां करतां येऊं नये; तें मला समजत नाहीं. खासगी शाळांतून ती चालण्यास तर हरकत नाहीं, व सरकारी शाळांतूनही ती चालू शकेल. एका मोठ्या धर्मांतील पोटभेद किती जरी असले तरी सर्वांस साधारण अशी तत्वें धर्मपुस्तकांतून सांगितलीं व तद्द्वारा नीतीचें बीजारोपण केलें तरच फायदा होणार आहे. ज्यांच्या मुखांतून ऐकलेल्या उपदेशाचा किंवा शिक्षणाचा परिणाम विद्यार्थ्यांच्या मनावर चांगला होईल असे धर्म व नीतीशिक्षणांत निष्णांत व आचरणानें शुद्ध अशा गुरूच्या मुखांतून झालेला उपदेश, हे हितावह होणार नाहींत असें नाहीं. पुष्कळ नास्तिक नीतिमान निपजले आहेत. धर्म व नीति यांचा कांहीं संबंध नाहीं, हीं तत्वें किती जरी खरीं असलीं तथापि, ज्यांच्या ठिकाणीं सदसद्विचारशक्तीचा प्रादुर्भाव झाला नाहीं, व बुद्धीस ही पक्वता आली नाहीं, अशा अठरा वीस वर्षां खालच्या वयाच्या बलांस हीं तत्वें सांगणें हितावह होणारें नाहीं. ज्यांची शिक्षणांत फार गति झाली आहे, ज्यांचे विचार प्रगल्भ झाले आहेत, व ज्यांना आपल्या ज्ञानाच्या व अनुभवाच्या जोरानें विचार करितां येत आहे, अशा प्रौढ वयाच्या लोकांस मनःस्वातंत्र्य पूर्ण असावें. त्याविषयीं कांहीं कोणाची हरकत नाहीं. परंतु लहान मुलांस, 'ज्याच्या योगानें एकंदर मनुष्यजातीचें हित होतें तो सदाचार,' अशा प्रकारच्या तात्विक व्याख्या सांगून उपयोग नाहीं. हरिश्चंद्राची गोष्ट नुसती सांगून उपयोग नाहीं. तर, धर्माच्या पांवरुणा खालीं ती सांगितल्यानें तिच्या पासून मनावर होणारे संस्कार चांगल्या रीतीनें घडणारे आहेत. वडील माणसांशीं नम्रपणें वागणें, पुराणिक कथेकरी वगैरेंना मान देणें व धर्मसंबंधीं सांगितलेलें अवश्य असें कांहीं तरी आचरण करणें, वगैरे गोष्टीची जी पूर्व परंपरा आहे तीस अत्यंत विरुद्ध भासेल अशी कोणचीही पद्धत लोकप्रिय होणार नाहीं व त्यापासून व्हावि तसे इष्ट परिणामही दिसणार नाहींत. शाळांतून निरनिराळ्या धर्मांचे जरी लोक असले तरी हिंदु पुष्कळ आहेत व संस्कृत शिक्षकांच्या सोयीप्रमाणें व्यवस्था करावी म्हणून सांगितलें. तशी सोय केल्यास नड येणार नाहीं. या विषया वरचें हें माझें मत पुष्कळांस या ठिकाणीं रुचणार नाहीं हें मी समजून आहें; परंतु येवढ्या करितां तें तेथें न सांगणें म्हणजे कर्तव्यास चुकणें होय. येथें भाषण करण्यांत सत्याचा अपलाप करण्याचा किंवा कोणाच्या मताचें गोपन करण्याचा यत्किंचितही प्रयत्न नाहीं. इतकें सांगून व या विषयाचा विचार सर्वांनीं शांतपणें व गंभीरपणें करावा, असें सांगून विसऱ्याकडे वळलों. ज्ञा. प.

☞ हें पत्र आकोला येथें के० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.